# आता वंदू कवीश्वर ३



रत्नाकर महाजन

# आता वंदू कवीश्वर ३

रत्नाकर महाजन

ई साहित्य प्रतिष्ठान

# आता वंदू कवीश्वर भाग ३

(मराठी काव्याच्या २००० वर्षांच्या प्रवासाचा आढावा)

रत्नाकर महाजन
विलेपार्ले, मुंबई
ramahajanp@yahoo.com
ph. 8879011951

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

ई प्रकाशक :

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

ई प्रकाशन :३० एप्रिल २०१७

©esahity Pratishthan®2017

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्री. रत्नाकर महाजन



श्री रत्नाकर महाजन हे वयाची ऐंशी ओलांडलेले एक तरुण लेखक. एअर इंडियातून निवृत्तीनंतर त्यांच्या साहित्यिक प्रतिभा विशेषत्त्वाने प्रफ़ुल्लीत झाल्या. त्यांनी भारतीय हवाई वाहतुकीवर तीन खंडांचे एक पुस्तक लिहीले. त्यानंतर ई साहित्य प्रतिष्ठानसाठी पंख १ आणि पंख २ ही जागतिक हवाई वाहतुकीच्या इतिहासाची तोंडओळख करून देणारी दोन ई पुस्तके त्यांनी लिहीली. याच काळात ओरिगॅमी या विषयाचा सखोल अभ्यास करून त्यांनी अनेक ठिकाणी प्रात्यक्षिकांसह भाषणे केली. लोकांच्या आग्रहानुसार त्यांनी ओरिगॅमी या विषयावरही एक पुस्तक लिहीले जे ज्योत्स्ना प्रकाशन यांनी प्रकाशित केले. आपल्या अभ्यासाच्या कक्षा रुंदावत त्यांनी हिंदू धर्मग्रंथांचा मुळापासून अभ्यास करायला घेतला व त्यावरही "धर्मग्रंथ" नांवाचे एक सुंदर वाचनीय पुस्तक लिहून ई साहित्यच्या वाचकांसाठी विनामूल्य दिले.

या सोबत संगीत आणि वाचन यांद्वारे ते सतत नवीन नवीन काही शिकत असतात व त्यावर स्फ़ुट लेखन करणे हा त्यांचा छंद आहे.

अफ़ाट आणि वैविध्यपूर्ण वाचन आणि साक्षेपी लेखन करून ते ई साहित्यच्या वाचकांना विनामूल्य देतात. तरुणांना लाजवील असा त्यांचा उत्साह कायम वृद्धींगत राहून त्यांना उदंड अयुष्य आणि उत्तम आरोग्य लाभो व त्यांचे कडून वाचकांची व मायमराठीची सेवा घडो हीच आमची शुभेच्छा!

टीम ई साहित्य

आता वंदू कवीश्वर

-संत रामदास

'आता वंदू कवीश्वर' या पुस्तकाचा हा तिसरा आणि शेवटचा भाग सादर करीत आहे.

या भागातले कवी :

१) ना. घ. (नागोजीराव घनश्याम) देशपांडे

२) पु. शि. (पुरुषोत्तम शिवराम) रेगे

३) बा. सी. (बाळ सीताराम) मर्ढेकर

४) बा. भ. (बाळकृष्ण भगवंत) बोरकर

५) मनमोहन : गोपाळ नरहर नातू

६) कुसुमाग्रज : विष्णू वामन शिरवाडकर

७) वा. रा. (वामन रामचंद्र) कांत

८) पद्मा : पद्मा विष्णु गोळे

९) इंदिरा : इंदिरा नारायण संत

१०) विंदा करंदीकर

११) वसंत बापट

१२) मंगेश पाडगावकर

१३) शांता शेळके -

१४) नारायण (गंगाराम) सुर्वे -

१५) आरती प्रभू - चिंतामणी त्र्यंबक खानोलकर

गीतकार -

१६) राजा बढे -

१७) पी. सावळाराम - निवृत्तीनाथ रावजी पाटील

१८) ग. दि. गजानन दिगंबर माडगूळकर

१९) सुरेश (श्रीधर) भट

२०) जगदीश खेबुडकर -

२१) सुधीर मोघे -

२२) वंदना विटणकर -

२३) विद्रोही कविता - शरच्चंद्र मुक्तिबोध, केशव मेश्राम, नामदेव ढसाळ, दया पवार, मल्लिका अमरशेख, फ.मु. शिंदे.

१) ना. घ. (नागोजीराव घनश्याम) देशपांडे (१९०९-२०००) -



मराठीतले पहिले ध्वनिमुद्रित भावगीत 'रानारानात गेली बाई शीळ'

जन्म दिवशी नागपंचमी होती म्हणून नाव नागोराव ठेवण्यात आले. त्यांना लहानपणापासूनच कविता करण्याचा छंद होता. चित्रकलेचेही उत्तम अंग होते. व्यवसायाने ते वकील होते.

१९२९ साली त्यांनी लिहिलेली शीळ ही कविता वर्गमित्र गायक गोविंदराव जोशी (जे पुढे जी.एन. जोशी या नावाने प्रसिद्ध झाले) यांनी कार्यक्रमांमधून गायला सुरुवात केली. ती अतिशय लोकप्रिय झाली.

" ना.घ. देशपांड्यांच्या कवितेला समाजाला काही सांगायचे नाही. ती आपल्याच मर्यादित परिघात गुंतलेली आहे. त्या परिघात अन्य विषय येत नाहीत. या प्रणय-धुंद काव्यातील स्त्री ही केवळ स्त्री आहे - ती परजातीची अथवा संपत्तीने परवर्गातील नाही, परित्यक्ता नाही, पतिता नाही अथवा बालविधावाही नाही. तिच्यावर कसलाही अन्याय झालेला नाही. तिच्या स्त्रीत्वाला असा कोणताच आगंतुक गुण चिकटविलेला नसल्यामुळे तिच्याविषयीचे प्रेम 'शुद्ध' आहे __म्हणजे ते फक्त प्रेम आहे. त्यात दया, सहानुभूती, उद्धार इत्यादी 'सामाजिक' लचांडे नाहीत. जेथे समाजाचा विसर पडायला प्रेम शोधायचे तेथे पुन्हा त्याच्या बऱ्यावाईटाची उजळणी कशाला ? ' झाले जगाचे कडे माझ्यातुझ्या एवढे' असे आपल्यापुरते जग आवरणारी ही प्रेम-समाधी आहे. ती उपऱ्या विचारांनी ढळत नाही."

मराठीतले पहिले भावगीत

'रानारानात गेली बाई शीळ'

पुढे १९३२ साली एच.एम.व्ही.ने ती जी.एन.जोश्यांच्याच आवाजात ध्वनिमुद्रित केली. यातून भावगीत हा प्रकार मराठी संगीतक्षेत्रात रूढ झाला. 'रानारानात गेली बाई शीळ' हेच ते मराठीतले पहिले भावगीत.

काव्यसंग्रह : 'शीळ', 'अभिसार', 'ख़ूणगाठी' या काव्यसंग्रहास साहित्य अकादमी पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. याशिवाय 'कंचनीचा महाल', 'गुंफण' हे संग्रही प्रकाशित झाले.

१) रानारानांत गेली बाई शीळ -

रानारानात गेलि बाइ शीळ !
राया, तुला रे, काळवेळ नाही !
राया, तुला रे, ताळमेळ नाही !
थोर, राया, तुझं रे, कुळशीळ !

२) तुझ्यासाठी -

तुझ्यासाठी कितीदा तुझ्यासाठी रे !
मी  दुहेरी बांधल्या खूणगाठी__खूणगाठी रे !
मी दुपारी सोसले ऊन माथी__ऊन माथी रे !
लाविल्या मी मंदिरी सांजवाती__सांजवाती रे !

३) पिसाट मन -

मन पिसाट माझे अडले रे,
थांब जरासा !
वनगान रान गुणगुणले;
दूरात दिवे मिणमिणले;
मधुजाल तमाने विणले रे,
थांब जरासा !

४) आता -

अंतरीच्या गूढ गर्भी एकदा जे वाटले गऽ !
एकदा जे वाटले ते प्रेम आता आटले गऽ !
दूर सोनेरी सुखाचे पाहिले आभास मी तू :
रंगले आभाळ पूर्वी : तेच आता फाटले गऽ !

५) फार नको वाकू -

फार नको वाकू जरी उंच बांधा ;
फार नको झाकू तुझा गौर खांदा
दोन  निळे डोळे तुझे फार फंदी,
साज तुझा आहे जुईचा सुगंधी
चित्त मऊ माझे जशी रानकळी :
धुंद तुझी आहे नदी पावसाळी.
श्वास तुझे माझे जसा रानवारा,
प्रीत तुझी माझी जशी सांजतारा.

## २) पु. शि. (पुरुषोत्तम शिवराम) रेगे (१९१०-१९७८)

काव्यसंग्रह : 'फुलोरा', 'हिमसेक', 'दोला', 'गंधरेखा', 'पुष्कळा', 'दुसरा पक्षी', स्वानंदबोध' 'प्रियाळ', सुहृदगाथा. त्यांचे इतरही गद्य लेखन प्रसिद्ध आहे.

"रेग्यांच्या कवितांतील हा काव्यभाव एक वैशिष्ठ्यपूर्ण कामभाव आहे. त्याचा पहिला विशेष असा की, तो जीवनोत्सुकतेचे एक कल्पक रूप या अर्थाने तो कवितेत व्यक्त होतो. त्याचा दुसरा विशेष असा की, त्यात भारतीय कलेच्या प्राचीन परंपरेतील निकोप, न-नैतिक व विमुक्त दृष्टी आहे. तशीच त्यात आल्हाददायक सौंदर्यदृष्टीही आहे. परंतु या दोन विशेषांहून या कामभावाचा आणखी एक महत्वपूर्ण विशेष आहे; हा कामभाव केवळ शारीरिक पातळीवर राहात नाही. तो स्वत:पलीकडे जातो, स्व-अतीत होऊन तो प्रेमात व ज्ञानात उत्क्रांत होत राहतो. त्याच्या या उत्क्रमणाच्या क्रियेतच मानवी मनाचे उत्क्रमण होत असते "

१) लंपट ओले वस्त्र होउनी -

लंपट ओले वस्त्र होउनी
        अंग अंग तव लिंपून घ्यावे
हुळहुळणारे वस्त्र रेशमी
        होउन वरवर घोटाळावे
भुईवर निखळून नवख्यापरि तुज
        दुरून रात्री तसे पहावे;
पहाट होता पश्मीन्याची
        शाल होउनी तुज छपवावे.

२) त्रिधा राधा -

आकाश निळे तो हरि
अन् एक चांदणी राधा __
बावरी
युगानुयुगिची मन-बाधा
विस्तीर्ण भुई गोविंद
अन् क्षेत्रे साळिचे राधा__
स्वच्छंद
युगानुयुगिची प्रियंवदा.
जलवाहिनि निश्चल कृष्ण
बन झुकले काठी राधा__
विप्रश्न
युगानुयुगिची चिर-तंद्रा.

३) पुष्कळा

पुष्कळ अंग तुझं, पुष्कळ पुष्कळ मन;
पुष्कळातली पुष्कळ तू
पुष्कळ पुष्कळ माझ्यासाठी.
बघताना किती डोळे पुष्कळ तुझे,
देतांना पुष-पुष्कळ ओठ;
बाहू गळ्यात पुष्कळ पुष्कळ,
पुष्कळ ऊर,
पुष्कळाच तू , पुष्क-कळावंती,
पुष्कळ पुष्कळ पुष्कळणारी.

४) उद्‌गार -

आपणाला दोन गोष्टी  टाळायला हव्यात :
तुला मी ; मला तू.

अलीकडे पुन्हा स्वप्नात  सारखा तूच येतोस.
का हा माझा इतका ध्यास ?

पहिले आठवायला जर  इतकी वर्षे लागली
तर विसरायला किती लागतील !

५) पेपर

रोज सकाळी चहा पिताना
हवा चवीला खरपूस पेपर
चेतवितो जो विश्वचि सारे,
विरघळतो जो पापण्यांचवर;
कामाला जाताना अमुची
ज्यात शिदोरी, जंतरमंतर;
गर्दीमध्ये, क्यूमध्ये जो
जना-मनातील सरकवि अंतर.

## ३) बा. सी. (बाळ सीताराम) मर्ढेकर (१९१०-१९८४)



'आधुनिक नवकवितेचे जनक'

कवितेला सर्व जोखडातून मुक्त करून स्वतंत्र केल्याचे श्रेय मर्ढेकरांकडे जाते. त्यांच्यामुळेच आजचे कवी इतक्या सहजतेने आणि मोकळेपणाने लिहू शकतात !

' शिशिरागम 'चे प्रास्ताविक : श्रीधर बाळकृष्ण रानडे

" उत्तरवारा म्हणाला -

"वसंतात फुटलेली पालवी, मंद वायूबरोबर डुलणारी आणि वृक्षपोषण करून करून त्यावर फुलांचे व रसाळ फळांचे घोस आणणारी कोमल पाने शरदऋतूपर्यंत सृष्टीसौंदर्यात भर घालीत रसिकांना अल्पस्वल्प आनंद देत होती. हेमंतात जीवितकार्य संपविण्यास सुरुवात करून शिशिरागमाचे वेळी ती उत्तरवाऱ्याची, हिमतुषारांची, बर्फगारांची मार्ग प्रतीक्षा करीत आहे.

अनेक शिशिर आले नि गेले. झाडाखाली पानांच्या पाचोळ्यात जमलेला दाट थर बराचसा मातीत मिळून गेला. अनेक असहाय पाने उत्तरवाऱ्याबरोबर उडत, गिरक्या खात दिगंताला गेली. उरलीसुरली थोडीशी कडेपारीत अचानक अडकून राहिली. कडेपारीतल्या या पानांवरल्या शिरांच्या जाळ्यात गतकालीन उत्कट भावना अस्पष्ट उमटलेल्या दिसतात. मलूल शुष्क देठ, जरठ पिवळा कुरतडलेला पर्णभाग आणि शिरा अशा जीर्ण देहातच त्या भावना तग धरून असतात. एका दुर्गम कड्याच्या कपारीत सुदैवाने काही पाने सापडली ती ही.

झाडांनी टाकले, हिमतुषारांनी गोंजारले, गारांनी झोडपले आणि उत्तरवाऱ्याने गिरक्या खात उन्हातान्हात सोडले. आता पुन्हा तोच उत्तरवारा त्या पानांचे शुष्क सांगाडे एकत्र करीत करीत तेथे आला आणि म्हणाला --"

'काही कवितां'चे प्रास्ताविक - बा. सी. मर्ढेकर

" 'शिशिरागम' प्रसिध्द झाल्याला आठ वर्षे झाली. त्यानंतरच्या ह्या पाचपन्नास कविता.

शब्दांवर थोडी हुकमत असली आणि लय तोंडवळणी पडली म्हणजे कविता लिहिणं फारसं कठीण नसतं. त्यापलीकडे काही पुढील लिखाणात आहे किंवा नाही हे वाचकाच ठरविणार. त्याचं मत अनुकूल पडलं नाही तर लेखकानं योग्य तो बोध घ्यावा. पण 'भूमिके'चा टोप चढवून आणि तळटिपांचे पैंजण घालून नकटीला शारदेचं सोंग घ्यायला लावणं हा त्यावर तोडगा खास नाही."

मर्ढेकरांच्या कवितेच्या नुसत्या पहिल्या ओळी वाचल्यातरी त्यांचे वेगळेपण सहज जाणवते.

१) काळ मारुनी गेला टपली
न कळत;
डोक्यावरती तुळई
उदात्ततेची खुद्कन हसली,
जणु दरियामधि धोका - समई.

२) गणपत वाणी बिडी पिताना
चावायाचा नुसतीच काडी;
म्हणायचा अन् मनाशीच की
ह्या जागेवर बांधिन माडी ;
मिचकावुनि मग उजवा डोळा
आणि उडवुनी डावी भिवयी,
भिरकावुनि ती तशिच द्यायचा
लकेर बेचव जैसी गवई.

३) जिथे मारते कांदेवाडी
टांग जराशी ठाकुरद्वारा,
खडखडते अन् ट्रॅम वाकडी
कंबर मोडुनि, चाटित तारा;
त्या नाक्यावर तंग हवेली
उत्साहाची ठिगळ्या चोळी
घालुनि बसली, बोथटलेली
शिळी स्तनाग्रे झाकित :

४) न्हालेल्या जणु गर्भवतीच्या
सोज्वळ मोहकतेने बंदर
मुंबापुरिचे उजळत येई
माघामधली प्रभात सुंदर.

५) पंक्चरली जरि रात्र दिव्यांनी,

तरी पंपतो कुणि काळोख;
हसण्याचे जरि वेड लागले,
भुंकतात तरि अश्रू चोख.

६) पिपात मेले ओल्या उंदिर; (अत्यंत गाजलेली कविता)
माना पडल्या, मुरगळल्याविण ;
ओठांवरती ओठ मिळाले ;
माना पडल्या, आसक्तीविण.

७) फलाटदादा, फलाटदादा,
येते गाडी, जाते गाडी;
फलाटदादा, आली ही -
पण
शिंगल पडला, गेली गाडी !

८) अशा येथल्या संसारात
जगण्याचाही चुकला पाढा;
आणि शेवटी परिस्थितीचा
गळयाखालती उतरे काढा.
- सर्वे जन्तु रुटिन: ।सर्वे जन्तु निराशयाः ।
सर्वे छिद्राणि पंचन्तु ।मा कश्चित् दु:ख-लॉग् भरेत् ।।



## ४) बा. भ. (बाळकृष्ण भगवंत) बोरकर (१९१०-१९८४)



"ज्ञानेश्वरीच्या शब्दकलेचे, पदलालित्याचे ऋण बोरकरांची शैली सातत्याने वागवीत आली आहे. बोरकरांची रचना, चतुर व शहाणी होण्यासही ज्ञानदेवीचे बरेच सहाय्य झाले असावे. गोमाताकीय संत कवी सोहिरोबा अंबिये यांच्या पद रचनेचा व गोमंतकातील लोकगीतांचाही काही एक ठसा बोरकरांच्या शैलीवर उमटलेला दिसतो. बोरकरांचे व्यक्तित्व व कवित्व असे संस्कारबहुल आहे. त्यात आपापत: परस्पर विरोधी वाटणारेही काही प्रवाह आहेत. या रसलंपट कवीवर रसवर्ज्य दिसणाऱ्या गांधीजींचा असलेला प्रभाव अशापैकीच. बोरकरांचा 'महात्म्यायन' रचण्याचा संकल्प किंवा राजकारणात सहभागी होण्याची त्यांची उर्मी यातूनच उदित झालेली. 'दुधसागर' एक साधा 'धबधबा', पण बोरकरांनी त्याचे वर्णन करताना त्यातून एक महिम्नस्तोत्र उभे केले.

हास खदखदून असा दुधसागरा
लासल्या गिरिदरीत फेक फेस पांढरा
हास्यी तव वेदघोष
सृजनाचा दिव्य तोष
जीवनकल्लोळ हर्ष शुभंकरा

कृष्ण व निळा रंग बोरकरांच्या विशेष लोभातला.

निळावले मन, निळावले तन
निळावले नवनीत घटातून,
निळ्या वेळुतिल शीळ निळी सखि, निळा उरातील पीळ
निळ्या निळ्या प्राणातिल ज्योती
निळी निळी डोळ्यातील मोती
घननीळाच्या निळ्या गालिंचा निळा निळा मी तीळ' "

(प्रस्तावना, चांदणवेल. गो.म.कुलकर्णी)

बोरकरांची गाजलेली गीते -

१) कशि तुज समजावु सांग ? का भामिनी उगिच राग ?
हास्याहुन मधु रुसवा हेमंती उष्ण हवा
संध्येचा साज नवा हा का प्रणयानुराग?

२) डोळे तुझे बदामी देती मला सलामी
त्यानेच हा असा मी झालो गडे निकामी

३) तव नयनाचे दल हलले ग !
पानावरच्या दवबिंदूपरि
त्रिभुवन हे डळमळले ग !

४) सरिंवर सरी आल्या ग
सचैल गोपी न्हाल्या ग
गोपी झाल्या भिजून चिंब
थरथर कापति निंब-कदंब

५) तेथे कर माझे जुळती दिव्यत्वाची जेथ प्रतीती

यज्ञी ज्यांनी देऊनि निजशिर
घडिले मानवतचे मंदिर
परी जयांच्या दहनभूमीवर
नाही चिरा नाही पणती
तेथे कर माझे जुळती

६) गडद निळे गडद निळे जलद भरुनी आले
शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले

७) जीवन त्यांना कळले हो
मीपण ज्यांचे पक्व फळापरि
सहजपणाने गळले हो

८) स्वर्ग नको सुरलोक नको मज लोभस हा इहलोक हवा
तृप्ति नको मज मुक्ति नको पण येथिल हर्ष नि शोक हवा

९) नाही पुण्याची मोजणी नाही पापाची टोचणी जिणे गंगौघाचे पाणी

पूजेतल्या पानाफुला    मृत्यू सर्वांग सोहळा    धन्य निर्माल्याची कळा

१०) 'दीपका' ! मांडिले तुला सोनियाचे ताट    घडविला जडविला चंदनाचा पाट
घरदार प्रकाशाने भारी काठोकाठ    दारी आलेल्याची सोपी करू पायवाट

११) माझ्या गोव्याच्या भूमीत गड्या नारळ मधाचे
कड्याकपारीमधोनी घट फुटती दुधाचे
माझ्या गोव्याच्या भूमीत आंब्या-फणसांची रास
फुली फळांचे पाझर फळी फुलांचे सुवास


१२) विरले सगळे सूर तरी ही उत्तर-रात्र सुरेल
ओसरल्यावर आपण सजणे अशीच ओल उरेल
सरेल अपुली वाट तिथे ही अशीच लाट फुटेल
पहाट होता स्वप्न आपुले फुलात ओलावेल

१३) तापल्या आहेत तारा तोवरी गाऊनी घे
स्वप्न आहे लोचनी हे तोवरी पाहून घे

१४) तू गेल्यावर फिके चांदणे, घरपरसूही सुने-सुके
मुले मांजरापरी मुकी अन् दर दोघांच्या मधे धुके



५) मनमोहन : गोपाळ नरहर नातू (१९१२-१९९१)



कविवर्य मनमोहन यांची कविता ही एक बंडखोर कवीची कविता आहे. बंडखोरपणा हा मनमोहनांच्या रक्ताचाच धर्म आहे. ' तोंडे फोडाया शतकांची सरकवली मी वरती बाही' असे म्हणत शतकांना आव्हान देऊ इच्छिणारा हा बंडखोर कवी. त्यांच्या बंडखोर वृत्तीची चुणूक निरनिराळ्या प्रकारांनी काव्यात दिसून येऊ लागली. भराभर कविता लिहून त्यांची पुस्तके प्रसिध्द करण्याचा त्यांनी सपाटा लावला. मराठी कवितेतील सांकेतिकता, नाविन्याचा अभाव, कवींची आत्मसंतुष्ट आणि स्वप्नरंजनात्मक वृत्ती अशा अनेक दोषांविरुध्द त्यांनी सातत्याने प्रकट बंडच उभारलेले. पुढे पुढे तर 'राजकवींना' शह देण्यासाठी मनमोहन स्वत:ला 'लोककवी' ही म्हणून घेऊ लागले.

'आपल्या पुरोगामी विचारांची अभिव्यक्ती मनमोहनांनी मोठ्या अवसाने केलेली आहे. 'मूर्तीभंजन' या कवितेत देवाच्या छाताडावर घणाचे घाव घालायला सज्ज झालेला कवी देवाला एक आरोपपत्रच वाचून दाखवतो.

> 'तुझ्या देव्हाऱ्याशी लाख समया आणि मी मात्र दिडकीच्या रॉकेलला महाग !
> तुझ्या दारात चौघडे आणि माझ्या वाट्याला मात्र गिरणीचा भोंगा' अशा विरोधातून सर्व आरोपांची फैर झडते.

" मनमोहन मातेसमान, वेदासमान असलेल्या स्त्रीची स्तुती गातात व पुरुषांना बजावून सांगतात, की जे स्वातंत्र्य तुम्हाला हवे तेच तुम्ही स्त्रियांनाही द्या. स्त्री-पावित्र्य तुम्ही जपा, पण हाच कटाक्ष पुरुष-पावित्र्याबद्दलही ठेवा !

मनमोहनांची दोन भावगीते खूप प्रसिध्द होती.

१) कसा ग गडे झाला, कुणी ग बाई केला - राधे तुझा सैल अंबाडा ?

२)		मैत्रिणिंनो सांगू नका नाव घ्यायला !
नका विचारू स्वारी कशी
दिसे कशी आणि हसे कशी
कसं पाडलं मला फशी
कशी जाहले राजि-खुषी
नजीक येत मुहूर्त-वेळा
मैत्रिणिंनो सांगू नका नाव घ्यायला !

३)		श्रेष्ठ कवी जन्माला याया, मराठिचे गर्भाशय कोते |
अभंग ओव्यांच्या सोप्याश्या
निसरड्यातुनी मुलगी वाढली
विधुर 'संस्कृत' त्याशि शारदा
बळे बळे ही गोडि जोडली
धान्य दळाया 'जाती' घडली-क्षेत्री शालन कणीस नव्हते |
श्रेष्ठ कवी जन्माला याया मराठिचे गर्भाशय कोते |

४)		'राजकवीं'ना थोबाडाया, लोककवी मी पहिला झालो |
इंग्रजि राज्यामधले भारत
शालन् ! त्यातले 'पिवळे तुकडे'
जस्ती तल्वारी म्यानातून
घालून राजे फिरती नागडे
त्याचे 'भाट' पाहून मनी मी - जेव्हा शरमुनिया गेलो
'राजकवीं'ना थोबाडाया, लोककवी मी पहिला झालो |

५) एक अत्यंत गाजलेले गीत -
ती पहा, ती पहा, बापुजींची प्राणज्योती
तारकांची सुमनमाला देव त्यांना वाहती

## ६) कुसुमाग्रज : विष्णू वामन शिरवाडकर (१९१२ -१९९९)



कुसुमाग्रज म्हंटले की त्यांच्या ' गर्जा जयजयकार क्रांतीचा' ह्या ओळी आठवतात.

१९३९ साली डमडम येथील तुरुंगातील राजबंद्यांनी अन्नत्याग केला आणि प्राणांतिक उपोषणाच्या त्यांच्या भयंकर निश्चयाने सर्व देशाचे लक्ष डमडम तुरुंगाकडे वळले. त्या राजबंद्यांचे क्रातिमय जीवन, त्यांची अचल ध्येयनिष्ठा आणि जीवन्मृतांनाही चैतन्य देणारी देशभक्ती, ही आठवून सर्वांची अंत:करणे आदराने भरून आली.

त्याप्रसंगी लोकांना खालील काव्यपंक्ती ऐकू आल्या :

१) ' गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार !
अन् वज्रांचे छातीवरी घ्या झेलून प्रहार !
पदोपदी पसरून निखारे आपुल्याच हाती
होऊनिया बेहोष धावलो ध्येय पथावरती
कधी न थांबलो विश्रांतीस्तव, पाहिले न मागे
बांधू न शकले प्रीतीचे व कीर्तीचे धागे
एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार
होता पायतळी अंगार

गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार ! (कुसुमाग्रज वय वर्षे २७)

२) कोलंबसाचे गर्वगीत -

'मार्ग आमुचा रोधू शक्ती ना धन ना दारा
घराची वा वितभर कारा
मानवतेचे निशाण मिरवू महासागरात
जिंकुनी खंड खंड सारा '

या गीतातल्या त्यांच्या ओळी नवे जग निर्मू पाहणाऱ्या आजच्या मानवालाही मार्गदर्शक आहेत.

त्यांचा पहिला काव्यसंग्रह 'जीवनलहरी'. 'जीवनलहरी'तील कुसुमाग्रज नव्या जाणिवेने 'विशाखे'त प्रगट झालेले दिसतात. 'स्वप्नाची समाप्ती' हे अतिसुंदर प्रेमगीत म्हणजे कुसुमाग्रजांच्या कल्पकतेने काठोकाठ भरलेला अमृत कलश आहे. ही कविता कितीही वेळा वाचली तरी रसिक मनाची तृप्ती होणार नाही.

३) 'काढ सखे, गळ्यातील - तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलीकडे - उभे दिवसाचे दूत !'

४) 'लिलाव' या कवितेत भांडवलशाही समाजरचनेत सावकारांच्या टाचेखाली चिरडल्या जाण्याऱ्या शेतकऱ्याचे कवीने केलेले चित्रण कुणाला हृदयस्पर्शी वाटणार नाही ? कष्टकरून अर्धपोटी राहणाऱ्या त्या बापड्याच्या झोपडीतून धान्य, बाजले, थाळी, गाडगीमडकी वगैरे सर्व वस्तू लिलावाकरिता बाहेर काढल्या जातात ! त्यांचे उपाशी पोर भुकेने व्याकूळ होऊन रडू लागते ! गरीब बिचारी शेतकरीण त्याला शांत करण्याकरिता पाजू लागते ! लगेच सावकाराचे लक्ष तिच्याकडे जाते; आणि

'ऊर उघडे ते तिचे न्याहळोनी
थोर थैलीतिल वाजवीत नाणी
'आणि ही रे !' पुसतसे सावकार
उडे हास्याचा चहूकडे विखार !'


५) ज्या समाजरचनेत गरीबाच्या जगण्याच्या हक्काचा आणि स्त्रीच्या शीलाचा असा लिलाव मांडला जातो ती समाजरचना शक्य तितक्या लवकर नष्ट झाली पाहिजे असा त्वेष वाचणाऱ्याच्या मनात उत्पन्न करण्याची शक्ती या कवितेत नि:संशय आहे.

"जुना धर्म, जुनी नीती, जुनी समाजरचना म्हणते 'देवाला शरण चला. तो दयाघन आहे. सर्व दु:खांचा परिहार करण्याला तोच समर्थ आहे !' पण हा उपदेश भोंदूपणाचा नसला तरी मूर्खपणाचा आहे हे कुसुमाग्रजांना कळून चुकले आहे. मानवजातीने ज्या दिवशी दगडातून देव निर्माण करून त्याच्यापुढे आपले डोके वाकविले, त्याच दिवशी दिवशी तिने आपल्या प्रगतीच्या मार्गात एक अनुल्लंघनीय धोंड निर्माण करून घेतली. हा काल्पनिक देव दुर्बळांचा मित्र होऊ शकत नाही. तो सत्ताधाऱ्यांना आणि संपत्तीवाल्यांना मात्र सहाय्य करू शकतो. म्हणूनच 'देवाच्या दारी' या कवितेत कुसुमाग्रज देवाची जी संभावना करतात ती अगदी यथार्थ वाटते.

' म्हणतात तुझ्या दयेला न अंत
पुकारती संत थोरी तुझी
चिमण्यांच्या घरा लावसी मशाल
केवढी विशाल दया तुझी !
जळातले जीव तापत दुपारी
वाळवंटावरी ओढसी तू !
तुझ्या महिम्याची प्रचंड पुराणे
गमती तराणे अर्थहीन !'

६) 'कोट्यवधी जगतात जिवाणू  जगती अन् मरती
जशी ती गवताची पाती
नाविक आम्ही परंतु फिरतो सात नभाखाली
निर्मितो नवक्षितिजे पुढती.
चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती
कथा या खुळ्या सागराला
'अनंत अमुची ध्येयासक्ति अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला !'

## ७) वा. रा. (वामन रामचंद्र) कांत (१९१३-१९९१)



टोपणनाव - रसाळ वामन, अभिजित, आणि कांतकाव्यसंग्रह :
'दोनुली', 'पहाटतारा', 'बगळ्यांची माळ', 'मरणगंध' (नाट्यकाव्य), 'मावळते शब्द', 'रुद्रवीणा'
'वाजली विजेची टाळी', 'वेलांटी', 'शततारका', 'सहज लिहिता लिहिता' पहाटतारा, फटत्कार, वेलांटी,

गाजलेल्या काही कविता / गाणी -

१) आज राणी पूर्विची ती प्रीत तू मागू नको
२) त्या तरुतळी विसरले गीत
३) बगळ्यांची माळ फुले अजुनी अंबरात
४) राहिले ओठातल्या ओठात वेडे शब्द माझे,
५) भेट होती आपुली का ती खरी, की स्वप्न माझे ?
६) सखी शेजारिणी, तू हसत रहा; हास्यांत पळे गुंफीत रहा

पुरस्कार -
१९६२-६३ 'वेलांटी ' या काव्यसंग्रहास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार
१९७७-७८ 'मरणगंध ' या नाट्यकाव्यास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार
१९७९-८० ' दोनुली' या काव्यसंग्रहास महाराष्ट्र शासनाचा 'केशवसुत ' पुरस्कार
१९८९-९० 'मावळते शब्द' या काव्यसंग्रहास महाराष्ट्र शासनाचा 'केशवसुत' पुरस्कार

सन्मान -
१९८८ महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्यातर्फे उत्कृष्ट वाङ्मयसेवेसाठी सन्मान
१९८९ महाराष्ट्र साहित्य परिषद, हैदराबाद यांच्यातर्फे उत्कृष्ट वाङ्मयसेवेसाठी सन्मान
१९८९ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे प्रदीर्घ वाङ्मयसेवेसाठी गौरववृत्ती देऊन सन्मान

८) पद्मा : पद्मा विष्णु गोळे (१९१३-१९९८)



या मराठी कवयित्री, लेखिका, नाटककार होत्या.

कवितासंग्रह -

आकाशवेडी, श्रावणमेघ, प्रीतिपथावर, निहार, स्वप्नजा, स्वप्न.

१) आम्ही कुलीनांच्या कन्या -

आम्ही कुलीनांच्या कन्या चाफेकळ्या पानाआड
मुळी मांडू ना आरास मुग्धपणे लावू वेड !
आम्ही कुलवती कन्या वाद फुकाचा ना घालू
शब्द चतुर मोजके हिरे-माणकांशी तोलू
आम्ही कुलशीलवती नाही बोलणार प्रीत
कुलीनांच्या डोळ्यांनाच समजेल गूढ हेत ! (नीहार)

२) लक्ष्मण रेषा -

तूच एकदा म्हटले होते
        प्रीत विसरणे अशक्य नाही,
प्रामाणिक तू -- विसरलासही !
        मलाच पण ते जमले नाही.
विसरलास तू -- मी झाले
        रे, केवळ गृहमंदिरभूषा;
विसरुनी जाया तुला, मजपुढे
        मीच ओढिली लक्ष्मणरेषा. (नीहार)

३) स्वप्नमयी -

तुझ्या नाजूक बांध्याला राजहंसीची गोलाई
तुझ्या चरणचालीत नागिणीची चपळाई
तुझ्या हसऱ्या डोळ्यात आकाशाची गे निळाई
काळ्या केसात श्वासात दरवळे जाईजुई
तुझ्या मृदुल कांतीला ताज्या दुधाची झिलई
तुझ्या केतकी स्पर्शात चांदण्याची शीतळाई (नीहार)

४) आम्ही महाराष्ट्रकन्या -

आम्ही महाराष्ट्रकन्या
माय मराठी आमुची;
स्वर्गाहुनीही आम्हाला
माया मराठी भूमीची. (आकाशवेडी)

५) अवखळ ये पोरीसमान -

अवखळ ये पोरीसमान आज सकाळ
तोडीत गळ्यातील सोन्याची फुलमाळ
नादात वाजवित रुमझुम अपुले चाळ
घरट्यांतुनि उडवी खगास हीच खट्याळ (नीहार)

## ९) इंदिरा : इंदिरा नारायण संत (१९१४-२०००)



काव्यसंग्रह :

गर्भरेशीम, निराकार, बाहुल्या, मरवा, मृगजळ, मेंदी, रंगबावरी, वंशकुसुम, फुलवेल, शेला.

कथासंग्रह - कदली, चैतू, श्यामली, इंदिरा संत यांच्या समग्र कविता.

१९५०च्या दशकात त्यांनी स्त्रीवादी कविता लिहण्यावर आपले लक्ष केंद्रित केले. आई, पत्नी, मुलगी या नात्यांतून भारतीय स्त्रीचे दिसणारे खडतर जीवन त्यांनी आपल्या कवितांमधून हळुवारपणे मांडले आहे.

पुरस्कार -

साहित्य अकादमी पुरस्कार गर्भरेशीम, अनंत काणेकर पुरस्कार गर्भरेशीम
साहित्य कला अकादमी पुरस्कार घुंघुरवाळा, महाराष्ट्र शासन पुरस्कार शेला रंगबावरी
मृगजळ, कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान पुरस्कार

१) झोका -

उंच उंच माझा झोका
झोका बांधला आकाशाला;
झोका चढता उतरता
होतो पदर वारा वारा !

२)

कंटाळा आला आहे ...मुलांचा. त्यांच्या
खाण्यापिण्याचा, हट्टांचा, त्यांच्या दंग्याधुडगुसाचा.
.. कंटाळा आला आहे ..ह्यांचा. ह्यांच्या
बोलण्याचालण्याचा, सवयीलकबींचा. एकूण तपशिलांचा.
.. कंटाळा आला आहे ..घराचा. सजलेल्या
दालनांचा, टीपदार देखरेखीचा, चविष्ट रसोईचा.
.. तरी पडदा पडतो आहे, वर जातो आहे
सर्व काही ठाकठीक आहे.

| | | |
|---|---|---|
| ३) | नको नको रे पावसा | असा धिंगाणा अवेळी : |
| | घर माझे चंद्रमौळी | आणि दारात सायली; |
| | नको नाचू तडातडा | असा कौलारावरून : |
| | तांबे-सतेली-पातेली | आणू मी भांडी कोठून ? |
| ४) | दारा बांधले तोरण | घर नाचले नाचले ; |
| | कधी येणार अंगणी | सोनचाफ्याची पाउले ? |

## विंदा करंदीकर, वसंत बापट आणि मंगेश पाडगावकर

वसंत बापट, विंदा करंदीकर आणि मंगेश पाडगावकर या कवींनी सतत चाळीस वर्षे बृहन्महाराष्ट्रात प्रवास करून आपल्या काव्यवाचनाने मुलुख गाजविला. त्या काळात त्यांच्या कवितांनी मराठी रसिकांना वेडे केले होते. काव्यरसिकांवर गारुड करणारी एक अजब बेहोषी या तिघांच्या काव्यवाचनात असायची. १९५० ते १९९० अशी तब्बल चार दशके या तिघांच्या काव्यवाचनाची मोहिनी कायम होती.

माझे भाग्य असे की यांचे कार्यक्रम होत असत तो काळ माझ्या शाळा / कॉलेज आणि नंतर नोकरीची सुरुवातीची काही वर्षे असा होता. मुंबईत होणारे कार्यक्रम मी सहसा चुकवीत नसे. त्यामुळे ते वाचून दाखवीत असलेल्या कविता तोंडपाठ झाल्या होत्या. आजही आठवले की जुन्याकाळात रमून जातो.

१९९०च्या दशकानंतर मात्र उतारवयामुळे तिघांनीही कार्यक्रम कमी केले आणि नंतर या त्रयीतले एकेक जण गळायला लागले. आधी वसंत बापट गेले, नंतर विंदांनी निरोप घेतला आणि शेवटी 'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे' म्हणणारे मंगेश पाडगावकरही गेले. मात्र बापट-पाडगावकर-करंदीकर कुणीही नसलं, तरी त्यांनी रुजवलेली काव्यवाचनाची गोडी मात्र मराठी मनांमनांत झिरपली आहे.


बापट-पाडगावकर-करंदीकर या तिघांच्याही काव्याचे रूप एकमेकांपेक्षा वेगळे होते. वसंत बापटांची कविता संस्कृतप्रचुर आणि रोमॅन्टिक होती, पाडगावकरांची कविता भावकविता होती, तर विंदांची कविता या दोघांपेक्षा वेगळी, म्हणजे केंद्रस्थानी माणूस असलेली वास्तववादी होती. परंतु वेगळ्या धाटणीच्या तीन शैली एकत्र ऐकायला मिळत असल्यामुळे रसिक त्यांच्या काव्यवाचनाला आवर्जून हजेरी लावायचे. त्यांच्या या काव्यवाचनाच्या यशाचे गमक त्यांच्या काव्यवाचनाच्या शैलीतही होते.

वसंत बापटांचा आवाज काहीसा पिचका होता. पण त्यांच्यात नट दडलेला असल्यामुळे 'सुपारी' किंवा 'अस्सल लाकूड भक्कम गाठ, ताठर कणा टणक पाठ'सारख्या कविता ते म्हणायचे, तेव्हा रसिकांसमोर ती कविता दृश्यमान व्हायची.

विंदांचा आवाज त्यांच्या कवितेसारखाच टोकदार होता; त्यामुळे त्या आवाजात 'धोंड्या न्हावी' किंवा 'ती जनता अमर आहे'सारखी कविता ऐकताना एकदम भारुन जायला व्हायचे.

तर कवितावाचन करताना मंगेश पाडगावकर एकदम खर्जातला आवाज लावायचे. या आवाजात 'सलाम' किंवा 'एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून'सारख्या कविता म्हणताना त्यांचा एकदम आश्वासक सूर लागायचा. या वैशिष्ट्यांमुळेच या त्रयीने मराठी रसिकांवर अक्षरशः अधिराज्य गाजवले. विशेष म्हणजे पैसे मोजून घेऊन मग आपली कविता ऐकवायची सवय या तिघांनीच महाराष्ट्राला लावली.

## १०) विंदा करंदीकर (१९१८ - २०१०) -



विंदानी मराठी कवितेत अनेक प्रकारचे प्रयोग यशस्वीरीत्या हाताळले. उदा: विरूपिका. मराठी बालकविता लिहून एक नवा पायंडा पाडला.

त्यांचे काव्यसंग्रह - श्वेद्गंगा (१९४९), मृद्गंध (१९५४), धृपद (१९५९),जातक (१९६८), विरूपिका (१९८०), संहिता (१९७५), आदिमाया (१९९०), मुलांसाठी - राणीचा बाग (१९६१), सशाचे कान (१९६३), परी ग परी (१९६५)

२००६ साली त्यांना ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

त्यांनी स्वत:च स्वत:च्या कवितांचे इंग्रजी भाषांतर 'Vinda Poems' (१९७५) या नावाने प्रकाशित केले. त्यांनी लघुनिबंधही लिहिले.

ज्ञानपीठ पुरस्कार (२००६) मिळवणारे ते तिसरे मराठी कवी/लेखक. त्यापूर्वी १९७४ साली ज्येष्ठ लेखक विष्णू सखाराम खांडेकर आणि १९८७ साली कविवर्य कुसुमाग्रज यांना हा मनाचा पुरस्कार मिळाला होता.

१) चिंधी - (त्यांच्या कविता वाचनाच्या कार्यक्रमात पुढील पांच कविता हमखास असायच्या)

चिंधी होती कृष्णआधी;
चिंधी उरली कृष्णेनंतर;
काळोखाची टिचभर चिंधी
ब्रह्माचे लपवी अवडंबर.
या चिंधीशी जपून बोला.
सृजनापासून सरणापावत
चिंधीचा मिचमिचतो डोळा.

२) सब् घोडे बारा टक्के -

जितकी डोकी तितकी मते; जितकी शिते तितकी भुते;
कोणी मवाळ, कोणी जहाल; कोणी सफेद, कोणी लाल;
कोणी लठ्ठ, कोणी मठ्ठ; कोणी ठिले कोणी घट्ट;
कोणी कच्चे, कोणी पक्के; सब घोडे बारा टक्के !

३) तरुणपणी - (विरूपिका) -

लहानपणी त्याने एकदा दर्यामध्ये
लघवी केली.
आणि आपले उर्वरित आयुष्य
त्यामुळे

दर्याची उंची किती वाढली
हे मोजण्यात खर्ची घातले.

४) तेच ते -

सकाळपासून रात्रीपर्यंत तेच ते ! तेच ते !
माकडछाप दंतमंजन; तोच चहा, तेच रंजन;
तीच गाणी, तेच तराणे; तेच मूर्ख, तेच शहाणे;
सकाळपासून रात्रीपर्यंत तेच ते ! तेच ते !

५) घेता -

देणाऱ्याने देत जावे; घेणाऱ्याने घेत जावे.
घेता घेता एकदिवस देणाऱ्याचे हात घ्यावे !

६) झपताल -


ओचे बांधून पहाट उठते .. तेव्हापासून झपाझपा वावरत असतेस.
..कुरकुरणाऱ्या पाळण्यामधून दोन डोळे उमलू लागतात;
आणि मग इवल्या इवल्या मोदकमुठीतून तुझ्या स्तनांवर
बाळसे चढते. उभे नसून वावरत असतेस. तुझ्या पोतेऱ्याने
म्हातारी चूल पुन्हा एकदा लाल होते.

सुंदर भावगीते -

१) मागू नको सख्या जे माझे न राहिलेले;
ते एक स्वप्न होते स्वप्नात पाहिलेले.

२) सर्वस्व तुजला वाहुनी माझ्या घरी मी पाहुणी
सांगू कसे सारे तुला, सांगू कसे रे याहुनी.
३) घेउनी जा सर्व माझे, काहिही ठेवू नको;
दु:ख माझे एकटीचे, तेवढे नेऊ नको.

## ११) वसंत बापट - विश्वनाथ वामन बापट (१९२२ - २००२) -



बापट तरुण वयातच भारताच्या स्वांतत्र्यलढ्यात सहभागी झाले होते. इ.स. १९४२ च्या चलेजाव चळवळीत त्यांचा सहभाग होता. ऑगस्ट १९४३ पासून जानेवारी १९४५ पर्यंत ते तुरुंगात होते.

ते दिल्लीच्या साहित्य अकादमीचे सदस्य होते. लहानपणापासून बापटांवर राष्ट्रसेवा दलाचे आणि साने गुरुजींच्या सहवासाचे संस्कार झाले. शेवटपर्यंत ते राष्ट्रसेवा दलाशी संलग्न होते.

'बिजली' ह्या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहावर ह्या संस्कारांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. 'अकरावी दिशा', 'सकीना' आणि 'मानसी' हे त्यांचे 'बिजली'नंतरचे काव्यसंग्रह होते. त्यांनी लहान मुलांसाठीही कविता लिहिल्या. वसंत बापट इ.स. १९८३ ते इ.स. १९८८ या काळात साधना नियतकालिकाचे संपादक होते.

पौराणिक व ऐतिहासिक कथानकांवरची त्यांची नृत्यनाट्येही प्रभावी ठरली. 'केवळ माझा सह्यकडा' ही त्यांची कविता सर्वतोमुखी झाली. 'गगन सदन तेजोमय' सारखे अप्रतिम प्रार्थनागीत त्यांनी लिहिले. कालिदासाच्या विरही यक्षाची व्याकुळता त्यांनी मेघहृदयाच्या रूपाने मराठीत आणली. त्यांची 'सकीना' उर्दूचा खास लहेजा घेऊन प्रकटली आणि, 'तुला न ठेवील सदा सलामत जर या मालिक दुनियेचा, कसा सकीना यकीन यावा कमाल त्यांच्या किमयेचा', सांगून गेली.

१९९९ मध्ये मुंबई येथे झालेल्या ७२ व्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते.

युगोस्लोव्हियातील आंतरराष्ट्रीय कविसंमेलनात भारताचे अधिकृत प्रतिनिधी म्हणूनही ते सहभागी झाले. १९७७ व १९९३मध्ये अमेरिकेत आणि १९९२ मध्ये आखाती देशांत त्यांचा काव्यदर्शन हा कार्यक्रम झाला. चंगा मंगा, अबडक तबडक, आम्ही गरगर गिरकी, फिरकी, फुलराणीच्या कविता आणि परीच्या राज्यात हे त्यांचे बालकवितासंग्रह आहेत, तर बालगोविंद हे बालनाट्य त्यांनी लिहिले.

काव्यसंग्रह :

अकरावी दिशा, अनामिकाचे अभंग आणि इतर कविता, अबडक तबडक (बालकवितासंग्रह)

अहा, देश कसा छान. आजची मराठी कविता (संपादित, सहसंपादन डॉ. चारुशीला गुप्ते)

आम्हा गरगर गिरकी (बालकवितासंग्रह), चंगा मंगा (बालकवितासंग्रह), ताणेबाणे

तेजसी, परीच्या राज्यात (बालकवितासंग्रह), प्रवासाच्या कविता, फिरकी (बालकवितासंग्रह)

फुलराणीच्या कविता (बालकवितासंग्रह), बिजली, मानसी, मेघहृदय, रसिया, राजसी, शततारका

शतकांच्या सुवर्णमुद्रा, शिंग फुंकिले रणी, शूर मर्दाचा पोवाडा, सकीना, सेतू

वसंत बापट यांच्या गाजलेल्या कविता

१) केवळ माझा सह्यकडा -

भव्य हिमालय तुमचाअमुचा, केवळ माझा सह्यकडा
गौरीशंकर उभ्या जगाचा, मनात पूजिन रायगडा
तुमच्याअमुच्या गंगायमुना, केवळ माझी भिवरथडी
प्यार मला हे कभिन्न कातळ, प्यार मला छाती निधडी
मधुगुंजन लखलाभ तुम्हाला, बोल रांगडा प्यार मला
ख्रिस्त बुद्ध विश्वाचे शास्ते, तुकयाचा आधार मला
धिक् तुमचे स्वर्गही साती
इथली चुंबिन मी माती
या मातीचे कण लोहाचे, तृणपात्यांना खड्गकळा
कृष्णेच्या पाण्यातून अजुनी वाहतसे लाव्हा सगळा

२) गगन सदय तेजोमय

गगनसदन तेजोमय
तिमिर हरून करुणाकर
दे प्रकाश देई अभय

छाया तव, माया तव
हेच परम पुण्यधाम
वाऱ्यातून ताऱ्यांतुन
वाचले तुझेच नाम
जगजीवन जनन-मरण
हे तुझेच रूप सदय

३) बाभुळझाड

अस्सल लाकूड, भक्कम गाठ
ताठर कणा टणक पाठ
वारा खात गारा खात बाभूळझाड उभेच आहे
जगले आहे, जगते आहे
काकुळतीने बघते आहे
खांद्यावरती सुताराचे घरटे घेऊन उभेच आहे.

४) सदैव सैनिका, पुढेच जायचे

सदैव सैनिका पुढेच जायचे
न मागुती तुवा कधी फिरायचे
नभात सैनिका प्रभात येउ दे
खगासवे जगा सुखात गाउ दे
फुलाफुलावरी सुवर्ण शोभू दे
जगास शांतता सुहास्य लाभु दे
न पाय तोवरी तुझे ठरायचे
सदैव सैनिका पुढेच जायचे


५) लावणी इवलीची - (कार्यक्रमात हमखास म्हणत असत !)

इटुक इवली भिंगरभावली बुब्बुळबिजली काळीभोर
चिटुक्क चिमणी चुटुक्क जिवणी खळकन् हासू फुटे बिलोर !
पर्करचोळीमधली पोर
झर्कन झाली फूलटपोर
नाचणनजरी सुळसुळपदरी छळछळ छळते छिंटछिचोर !

६) लावणी अखेरच्या विनवणीची

तुम्हि जीव लावला, मैत्र आपुले जुने
केलेत माफ तुम्हि शंभर माझे गुन्हे
हे एकच आता अखेरचे मागणे
ही मैफल अपुली अखंड चालो अशी
अम्हि जाणारच की कधीतरी पटदिशी

## १२) मंगेश पाडगांवकर - मंगेश केशव पाडगांवकर (१९२९ - २०१५ )



पुरस्कार - महाराष्ट्र भूषणपुरस्कार, साहित्य अकादमी पुरस्कार (इ.स. १९८०)

सलाम या कवितासंग्रहासाठी यांना इ.स. १९८० साली साहित्य अकादमी पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

प्रकाशित साहित्य

अफाटराव, आता खेळा नाचा, आनंदऋतू, आनंदाचे डोही, उदासबोध, उत्सव कबीर (कबीराच्या दोह्यांचा अनुवाद), कविता माणसाच्या माणसासाठी, काव्यदर्शन, गझल, गिरकी, चांदोमामा छोरी, जिप्सी, झुले बाई झुला, तुझे गीत गाण्यासाठी, तृणपर्णे, त्रिवेणी, धारानृत्य, नवा दिवस, निंबोणीच्या झाडामागे, फुलपाखरू निळं निळं, बबलगम, बोलगाणी, भटके पक्षी, भोलानाथ, मीरा, मुखवटे, मोरू, राधा, वाढदिवसाची भेट, वात्रटिका, वादळ (नाटक), विदूषक, वेड कोकरू, शब्द, शर्मिष्ठा, शोध कवितेचा, सलाम, सुट्टी एक्के सुट्टी, सूर आनंदघन, सूरदास, क्षणिका

मंगेश पाडगांवकर यांच्या काही विशेष प्रसिद्ध कविता

१) मी फूल तृणातिल इवले -

जरी तुझिया सामर्थ्याने
ढळतील दिशाही दाही
मी फूल तृणातिल इवले
उमलणार तरीही नाही

२) निर्मिती -

कळले ज्या क्षणी अंधाराला
नक्षत्रांशी अपुले नाते
ज्या क्षणि भेदुनि भूमीचा ठार
रुजून आले हिरवे पाते !

३) सत्कार -

पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार
उरी जेव्हा ज्वालारस झेलुन
धरतीने तप केले दारुण
सुकता सुकता नद्या म्हणाल्या हाच विश्वसंहार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

४) अहो जग पुढे गेले - (ही कविता ते आपल्या सुरुवातीच्या काळात हमखास वाचीत असत)

घराघरात घुमले तेव्हा तुक्याचे अभंग
निजलेल्या मनातला प्रकटला पांडुरंग
अमृताते पैजा जिंकी अशी ज्ञानेशाची ओवी
होती आणीत मनांना नवी अमृत-पालवी
आता सारे बदलले
अहो जग पुढे गेले
विसरा तो जुना घोष : 'रखुमाईवरा बापा'
आता ओठओठावर 'लारीलप्पा लारीलाप्पा'

५) तुझे गीत गाण्यासाठी -

तिन्ही लोक आनंदाने भरून गाउ दे रे
तुझे गीत गाण्यासाठी सूर लावू दे रे

६) श्रावणात घन नीळा बरसला -

श्रावणात घन नीळा बरसला रिमझिम रेशिमधारा
उलगडला झाडातून अवचित हिरवा मोरपिसारा

७) अशी पाखरे येती -

अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती
दोन दिसांची रंगत संगत दोन दिसांची नाती

८) पहिलीच भेट झाली -

पहिलीच भेट झाली, पण ओढ ही युगांची
जादू अशी घडे ही या दोन लोचनांची

९) अखेरचे येतिल माझ्या हेच शब्द ओठी;
लाख चुका असतिल केल्या, केली पण प्रीती

अत्यंत गाजलेली काही गीते :

१) जेव्हा तुझ्या बटांना उधळी मुजोर वारा
२) दार उघड, दार उघड, चिऊताई, चिऊताई दार उघड !
३) सांग सांग भोलानाथ, पाऊस पडेल काय?
४) कधी बहर, कधि शिशिर परंतु दोन्ही एक बहाणे
५) लाजून हासणे अन् हासून ते पहाणे
६) भेट तुझी माझी स्मरते अजुन त्या दिसाची
७) शब्द शब्द जपुन ठेव बकुळिच्या फुलापरी
८) शुक्रतारा, मंद वारा, चांदणे पाण्यातुनी
९) असा बेभान हा वारा, कुठे ही नाव मी नेऊ ?
१०) या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे
११) जेव्हा तिची नि माझी चोरून भेट झाली
१२) दूर आर्त सांग कुणी छेडिली असावरी
१३) शब्दवाचुन कळले सारे शब्दांच्या पलिकडले
१४) दिवस तुझे हे फुलायचे झोपाळ्यावाचून झुलायचे
१५) माझे जीवनगाणे, माझे जीवन गाणे
१६) मी फुले ही वेचताना सांज झाली
१७) डोळ्यात सांज वेळी, आणू नकोस पाणी
१८) एक जिप्सी आहे खोल माझ्या मनात दडून
१९) माग हवे ते गडे तू, माझे पंख मागू नको
२०) सांगा कसं जगायचं ? कण्हत कण्हत की गाणं म्हणत ?

एकदा पाडगावकरांची पावसावरची कविता 'लिज्जत'ने पाहिली आणि पाडगावकरांना विचारले, 'आमच्या जाहिरातीत वापरू का ही कविता?' पाडगावकरांनी आनंदाने परवानगी दिली आणि ती जाहिरात अनोखी ठरली. पाडगावकरांच्या काही नमुनेदार पाऊस-कविता

रिमझिम पावसात जाऊ गं,
गुण गुण गाणे गाऊ गं !
थेंब टपोरे आले गं,
सगळे गोकुळ न्हाले गं,
थुइथुइ नाचत न्हाऊ गं
रिमझिम पावसात जाऊ गं !

## १३) शान्ता ज. शेळके - (१९२२-२००२)



कार्यक्षेत्र साहित्य, पत्रकारिता, राजकारण, चित्रपट, शिक्षण
साहित्य प्रकार कथा, कादंबरी, कविता, चरित्र लेखन, वृत्तपत्रांत सदरलेखन
शांता शेळके या केंद्रीय फिल्म प्रमाण मंडळाच्या, तसेच राज्य नाटक परिनिरीक्षण मंडळाच्या सदस्य होत्या.

शांताबाईंची गीते डॉ. वसंत अवसरे यांनी आपल्या नावाने प्रकाशित केली !

अंगतपंगत, अनोळख, अलौकिक, आंधळी, इतस्तत:, इतार्थ, एक गाणे चुलीचे.

काव्यसंग्रह : कविता विसाव्या शतकाची, कविता स्मरणातल्या, कळ्यांचे दिवस फुलांच्या राती,

काही जवळ काही दूर, किनारे मनाचे, गोंदण, चौघीजणी, जन्मजान्हवी, जाणता अजाणता, तोच चंद्रमा, त्रिवेणी : गुलजार, धूळपाटी, निवडक शांता शेळके

पत्रम् पुष्पम्, पावसाआधीचा पाऊस, पूर्व संध्या, बासरी, मधुसंचय, मनातले घर, मेघदूत

अनुवाद, रंगरेषा, रूपसी, रेशीमरेघा, ललित नभी मेघ चार, लेकुरवाळी, वडीलधारी माणसं

वर्षा, शांतस्मरण, श्रावण शिवरा, सतीचा वाडा, संस्मरणे

असंख्य प्रसिद्ध गीतांपैकी काही मोजकीच -

१) अपर्णा तप करिते काननी
२) आज चांदणे उन्हात हसले
३) आज मी आळविते केदार
४) आला पाऊस मातीच्या वासात
५) आली सखी आली प्रियामीलना
६) ऋतु हिरवा, ऋतु बरवा
७) कशि गौळण राधा
८) कळ्यांचे दिवस फुलांच्या
९) का धरिला परदेश
१०) काटा रुते कुणाला
११) काय बाई सांगू
१२) किलबिल किलबिल पक्षि
१३) गगना गंध आला
१४) गजानना श्री गणराया
१५) गणराज रंगी नाचतो
१६) चांदण्या रात्रीतले ते
१७) छेडियल्या तारा
१८) जय शारदे वागीश्वरी

१९) जाईन विचारित रानफुला

२०) जिवलगा राहिले रे दूर

२१) जे वेड मजला लागले

२२) तुला न कळले मला न

२३) तोच चंद्रमा नभात

२४) दाटून कंठ येतो

२५) निळ्या अभाळी कातरवेळी

२६) नाही येथे कुणी कुणाचा

२७) पप्पा सांगा कुणाचे

२८) पुनवेचा चंद्रम आला

२९) प्रीति जडली तुझ्यावरी

३०) मध्यरात्रिला पडे तिच्या

३१) मनाच्या धुंदीत लहरीत

३२) मराठी पाउल पडते पुढे

३३) मागते मन एक काही

३४) मागे उभा मंगेश

३५) माजे रानी माजे मोगा

३६) माजो लवताय डावा डोळा

३७) माझी न मी राहिले

३८) मी डोलकर डोलकर

३९) रूपास भाळलो मी

४०) रेशमाच्या रेघांनी

४१) वादलवारं सुटलं गो

४२) शारद सुंदर चंदेरी

४३) शालू हिरवा पाच नि

४४) शूर अम्ही सरदार

४५) सांगू कशी प्रिया मी

४६) हाऊस ऑफ बॅम्बू

४७) ही चाल तुरुतुरु

४८) ही वाट दूर जाते

४९) हे बंध रेशमाचे

शांता शेळके यांना मिळालेले पुरस्कार :

गदिमा गीतलेखन पुरस्कार १९९६, सुरसिंगार पुरस्कार ('मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश' या गीतासाठी), केंद्र सरकारचा उत्कृष्ट चित्रगीत पुरस्कार (चित्रपट भुजंग), यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कार (२००१) साहित्यातील योगदानाबद्दल.

१९९६ या वर्षी आळंदी येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद

## १४) नारायण (गंगाराम) सुर्वे - (१९२६-२०१०)




साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी यांना १९९८ चा पद्मश्री पुरस्कार देण्यात आला.
काव्यसंग्रह : ऐसा गा मी ब्रह्म, जाहीरनामा, नव्या माणसाचे आगमन, माझे विद्यापीठ, सनद
पुरस्कार -
कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान पुरस्कार (२००४), मध्यप्रदेश सरकारचा कबीर पुरस्कार
पद्मश्री पुरस्कार (१९९८)

नारायण सुर्वे हे परभणी येथे इ.स. १९९५मध्ये भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते.

१) गाणे -

छानसे घरकुल नांदते गुलमोहराखाली
केवळ कांकणे किणकिणली असती.
रोजच आला असता चंद्र खिडकीत
नक्षत्रांपलीकडची एक दुनिया असती.
भरल्या पोटाने अगा पाहतो जर चंद्र
आम्हीही कुणाची याद केली असती.

२) लालबाग -

तुझ्याच कुशीचा आधार घेतघेत
कौलारी छपरांचा आडोसा घेत
ग्रंथ लेनिनचा पठण केला आम्ही
बंध तोडणारा हातोडा घेतघेत.

३) लुत अंगावर सडलेली
तुमची दुनियाच निराळी
अमुची दुनियाच निराळी

४)
एका नव्या संघर्षात -
हा माझाही देश; आणि त्यातील हे पोकेपोकेसे लोक
आपल्या घरालाच असे पोकेपण यावे; तर काय करावे ?

१५) आरती प्रभू - (१९३०-१९७६) : चिंतामणी त्र्यंबक खानोलकर



काव्यसंग्रह : 'जोगवा'- १९५९, 'दिवेलागण' - १९६२, 'नक्षत्रांचे देणे' - १९७५

संगीत नाटक अकादमी पुरस्कार - १९७६ व साहित्य अकादमी पुरस्कार १९७८ त्यांच्या 'नक्षत्रांचे देणे' या काव्यसंग्रहास.

संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांनी त्यांच्या गीतांना चाली लावल्या आणि ती गीते अजरामर केली.

'गेले द्यायचे राहूनी', 'ये रे घना', 'तू तेव्हा तशी' वगैरे.

त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्या : 'रात्र काळी घागर काळी', 'कोंडुरा', 'त्रिशंकू', 'गणुराया आणि चानी',

गाजलेली नाटके - 'एक शून्य बाजीराव', 'अजब न्याय वर्तुळाचा'.

१) मनाचा दगड -

गेले द्यायचे राहून
तुझे नक्षत्रांचे देणे;
आसपास आता कळ्या
आणि थोडी ओली पाने.
आता मनाचा दगड
घेतो कण्हत उशाला;
होते कळ्यांचे निर्माल्य
आणि पानांचा पाचोळा. (जोगवा)

२) आड येते रीत -

नाही कशी म्हणू तुला, म्हणते रे गीत;
परी सारे हलक्याने : आड येते रीत.
नाही कशी म्हणू तुला, विडा रे दुपारी;
परी थोरांच्या समोर घ्यायची सुपारी.
नाही कशी म्हणू तुला, पहाटगाणी;
परी घालायचे आहे तुळशीच पाणी. (जोगवा)

३) ये रे घना -

ये रे घना ये रे घना
न्हावू घाल माझ्या मना
फुले माझी अळुमाळू
वारा बघे चुरगळू
नको नको म्हणताना
गंध गेला रानावना (दिवेलागण)

४) उदासी -

ती येते आणिक जाते,
येताना कधि कळ्या आणिते,
जाताना पण फुले मागते.
येणे-जाणे,
देणे-घेणे
असते गाणे जे न कधी ती म्हणते
ती येते आणिक जाते... (नक्षत्रांचे देणे)


५) तू -

तू तेव्हा अशी,
तू तेव्हा तशी,
तू बहरांच्या बाहूंची.
तू ऐल राधा,
तू पैल संध्या,
चापेकळी प्रेमाची.
तू कुणी पक्षी :
पिसांवर नक्षी
कवितेच्या ईश्वराची. (नक्षत्रांचे देणे)

गीतकार - (हा स्वतंत्र भाग केला आहे)

एक काळ होता की गीतकारांना कवींपेक्षा कमी समजत असत ! पण भा.रा. तांबे, शांताबाई शेळके, मंगेश पाडगावकर इत्यादी कवी असे होते की ते कविता तर करीतच तसेच गीतेही लिहित. पुढे हा भेद नाहीसा झाला. एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. गीतकारांना कवींपेक्षा जास्त प्रसिद्धी मिळते.

१६) राजा बढे - (१९१२-१९७७)



" राजा बढे म्हणजे कविमनाचं एक राजबिंड व्यक्तिमत्व. अबोल परंतु कल्पनाविलास मात्र दांडगा. कित्येक नवीन कल्पना त्यांनी अमंलात आणल्या. मराठी साहित्य सभेची स्थापना, कथाकथन ह्या प्रकाराची निर्मिती आणि प्रेरणा त्यांचीच.कव्वालीची जुगलबंदी हा प्रकार त्यातलाच. उत्तम शब्दरचना करणे हा हातखंडा. म्हणून अनेक नाट्यगीते, चित्रपटगीते आणि भावगीते हे सहजरीत्या लिहित असत." - बबन बढे (राजाभाऊंचे धाकटे बंधू)

हे संपादक, चित्रपट अभिनेते, गद्य लेखक, नाटककार, कादंबरीकार, कथाकथनकार आणि गायक असले तरी त्यांची खरी ओळख मराठी कवी आणि गीतकार अशीच होती.

राजा बढे यांनी १९४० च्या आसपास 'सिरको फिल्म्स' मध्ये दोन वर्षे त्यांनी कामे केली. १९४२ मध्ये ते 'प्रकाश स्टुडिओ'त रुजू झाले. बंधू बबनराव यांच्या मदतीनं त्यांनी "स्वानंद चित्र' ही संस्था उभी केली.

स्वातंत्र्यवीर सावरकर हे राजा बढे यांचे दैवत होते. त्यांचे राष्ट्रप्रेम त्यांच्या 'क्रांतिमाला' (१९५२) या संग्रहात २१ कविता आहेत. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील देशभक्तिपर गीते आहेत. प्रत्यक्ष सावरकरांनी 'प्रस्तावनेत' ''आपण स्वतःच नामवंत, सुप्रतिष्ठित प्रतिभासंपन्न साहित्यिक असल्याने, माझ्या प्रस्तावनेची गरज नाही असे गौरवोद्गार काढले आहेत.

’क्रांतिमाला’तील ‘विस्मृतीत गुंफलेली क्रांतिमाला', ‘गगनात आज जो चंद्र सुखे मिरवावा । ते तेज घेऊनी करिती काजवे कावा । तो बाबू गेनू, कोतवाल उरलेले । विसरलो अनामिक किती बळी गेलेले',

‘सुजला सुफला देश आमचा', ‘हिमालय थिजला । थिजला धीरचा । गंगा सिंधुतुनी वाहतो प्रवाह रुधिराचा' अशा सर्वच कवितांमध्ये मंगल पांडे, हुतात्मा फडके, चाफेकर, सेनापती बापट अशा क्रांतिवीरांची नावे गुंफून त्यांना जनतेने विस्मृतीत टाकल्याचे दुःख व्यक्त केले आहे.

‘घडू दे पुन्हा एकदा भारत' मधून सावरकरांच्या दिव्य देशभक्तीचा गौरव केलेला असून, ‘नवोन्मेषशाली कवींच्या कवे' असे सावरकरांना संबोधले आहे.

१९६४ साली मुंबईत बढे यांच्या पुढाकाराने प्रथमच कथाकथनचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात पु. ल. देशपांडे, ग.दि. माडगूळकर यांनी प्रथमच त्यांच्या कथा कथन केल्या होत्या.

राजा बढे यांच्या काही गाजलेल्या कविता -

१) अजून यौवनात मी
२) आनंद मनि माईना
३) उधं ग अंबे उधं । दार उघड बये दार उघड ॥
४) कधी भेटेन वनवासी
५) कशी रे तुला भेटू
६) कळीदार कपूरी पान
७) घाई नको बाई अशी
८) चांदणे शिपीत जाशी चालता तू चंचले
९) जय जय महाराष्ट्र माझा
१०) डोळे मोडित गौळण राधा
११) त्या चित्त-चोरट्याला का
१२) दे मला गे चंद्रिके
१३) नका मारु खडा
१४) प्रेम केले काय हा झाला गुन्हा
१५) माझिया माहेरा जा
१६) मोहुनिया तुजसंगे नयन
१७) लेऊ कशी वल्कला
१८) हसतेस अशी का मनी

शाहीर साबळे यांनी त्यांच्या यशस्वी गान-कारकीर्दीचे श्रेय राजा बढे यांच्या ’जय जय महाराष्ट्र माझा’ या गीताला दिले आहे.

राजा बढे यांच्या नावे १८ कवितासंग्रह, ४ नाटके, ९ संगीतिका, ५ एकांकिका, एक कादंबरी आणि शिवाय विविध प्रसिद्ध साहित्याचे भावानुवाद आहेत.


किती रे दिन झाले (पत्रमय कादंबरी)

छंदमेघ (मेघदूताचा काव्यमय अनुवाद)

नाटके : पेचप्रसंग, स्वप्नगंधा, ही रात सवत बाई, अशी गंमत आहे, चतुर किती बायका.

काव्यसंग्रह : मखमल, मंदिका, माझिया माहेरा जा, योजनगंधा, वीणागीते, शृंगार श्रीरंग (गीत गोविंदचा काव्यानुवाद), शेफालिका - गाथा सप्तशतीचा काव्यानुवाद, हसले मनी चांदणे, ओहोळ, क्रांतिमाला.

## १७) पी. सावळाराम - निवृत्तीनाथ रावजी पाटील (१९१३ - १९९७)



भावगीते मराठीत रुजवण्यात ग. दि. माडगूळकर, शांता शेळके यांच्यासह सावळाराम यांचेही नाव घेतले जाते. मराठी गीतांना सुवर्णकाळ आणण्यात त्यांचाही मोठा वाटा होता.

सावळाराम यांचे 'गंगा जमुना डोळ्यात उभ्या का' हे गाणे विशेष गाजले.

पी. सावळाराम यांची काही गाजलेली गीते

१) असावे घर ते अपुले छान
२) आई कुणा म्हणू मी
३) आली हासत पहिली रात
४) कल्पवृक्ष कन्येसाठी
५) कोकिळ कुहुकुहु बोले
६) कृष्णा मिळाली कोयनेला
७) गा रे कोकिळा गा
८) गोड गोजिरी लाज लाजरी
९) गंगा जमुना डोळ्यांत उभ्या
१०) गंध फुलांचा गेला
११) घट डोईवर घट कमरेवर
१२) चंपक-गोरा कर कोमल
१३) जिथे सागरा धरणी मिळते
१४) जो आवडतो सर्वांला
१५) तूच कर्ता आणि करविता
१६) दर्पणी बघते मी गोपाळा
१७) देव जरी मज कधी भेटला
१८) धागा धागा अखंड
१९) पूर्व दिशेला अरुणरथावर
२०) पैठणी बिलगुन म्हणते

२१) पंढरीनाथा झडकरी
२२) प्रीत सागरी तुझ्या स्मृतीचे
२३) प्रेम तुझ्यावर करिते मी
२४) प्रेमा काय देऊ तुला
२५) बाळा होऊ कशी उतराई
२६) माझिया नयनांच्या कोंदणी
२७) मानसकन्या कण्वमुनींची
२८) मानसीचा चित्रकार तो
२९) मुली तू आलीस अपुल्या
३०) मूर्त रूप जेथे ध्यान
३१) रघुनंदन आले आले
३२) रघुपति राघव गजरी गजरी
३३) राधा कृष्णावरी भाळली
३४) राधा गौळण करिते
३५) रिमझिम पाऊस पडे
३६) लेक लाडकी या घरची
३७) विठु माझा लेकुरवाळा
३८) विठ्ठल तो आला आला
३९) शपथ दुधाची या
४०) सखी ग मुरली मोहन
४१) हरवले ते गवसले का
४२) हसले आधी कुणी
४३) हृदयी जागा तू अनुरागा
४४) ज्ञानदेव बाळ माझा

पुरस्कार आणि सन्मान-

पी. सावळाराम यांच्या कवितांच्या साध्या सोप्या रचनांमुळे कुसुमाग्रजांनी त्यांना 'जनकवी' ही उपाधी बहाल केली.

## १८) ग. दि. गजानन दिगंबर माडगूळकर (१९१९-१९७७)



विख्यात मराठी कवी व पटकथा-संवाद-लेखक. त्यांच्या उल्लेखनीय पुस्तकांपैकी काही अशी :

कविता–जोगिया, चार संगीतिका, काव्यकथा, गीत रामायण, गीत गोपाल, गीत सौभद्र.

कथासंग्रह–कृष्णाची करंगळी, तुपाचा नंदादीप, चंदनी उदबत्ती.

कादंबरी–आकाशाची फळे.

आत्मचरित्रपर–मंतरलेले दिवस आणि वाटेवरल्या सावल्या.

त्यांच्या गीत रामायणाने तर कीर्तीचा कळस गाठला; त्यांना 'महाराष्ट्र-वाल्मीकी' ही सन्माननीय पदवी लोकांनी स्वयंस्फूर्तीने दिली.

तुफान और दिया, दो आँखे बारह हाथ, गूँज उठी शहनाई हे त्यांनी लिहिलेले उल्लेखनीय हिंदी चित्रपट.

माडगूळकर हे उत्तम चरित्र अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, लाखाची गोष्ट, पेडगावचे शहाणे, वऱ्हाडी आणि वाजंत्री ह्या चित्रपटांत त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरलेल्या आहेत.

भारत सरकारने पद्मश्री देऊन (१९६९) त्यांचा सन्मान केला. १९७३ मध्ये यवतमाळ येथे भरलेल्या मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद त्यांना देण्यात आले होते.

'चैत्रबना' तील गीतांना अर्थानुरूप चाली देऊन ती गीते लोकप्रिय करण्याच्या कार्यातील अर्धा वाटा श्री सुधीर फडके या मान्यवर संगीत दिग्दर्शकांचा आहे. श्री. पु.ल. देशपांडे, माझ्याशी ओळख होण्यापूर्वीच माझी गीते आवडीने गात होते. योगायोगाने पुढे ते माझ्या गीतांचे संगीतकार झाले. या उभयता मित्रांचे ऋण ही फेडता येण्यासारखी गोष्ट नाही.

आपल्या चित्रपटातून ही गीते चित्रित करविणाऱ्या किती निर्मात्याची नावनिशी सांगू ? किती दिग्दर्शकांशी आभारप्रदर्शक हस्तांदोलन करू ? किती गायक-गायिकांच्या ओटीत मनमोकळे धन्यवाद घालू ? किती संगीत दिग्दर्शकांचे ऋण आनंदाने माथी घेऊ ?

श्री. व्ही. शान्तारामापासून गोविंदराव घाणेकरांपर्यंत अनेक निर्माते या चैत्रबनाच्या लावणीस कारण झाले आहेत. राजा परांजप्यांपासून मधुकर पाठकांपर्यंत अनेक दिग्दर्शकांनी याला 'चैत्र' रूप दिले आहे. मंगेशकर भगिनीपासून, स्वत: सुधीर फडक्यांपर्यंत कैक गायक-गायिकांनी या चैत्रबनाला स्वर सुगंध्दिले आहेत. श्री. वसंतराव देसायांपासून वसंत पवारांपर्यंत मराठीतील लहानमोठ्या संगीतकारांचे हात या नवशोभेसाठी राबले आहेत. हे 'चैत्रबन' त्या सर्वांचे आहे. मी सर्वांचा ऋणाईत आहे." ग.दि.मा. प्रस्तावना चैत्रबन.

त्यांच्या गाजलेल्या गीतांची संख्या इतकी मोठी आहे की नुसता उल्लेख करायचा तरी काही पाने लागतील. त्यामुळे अगदी थोडक्यात -

१) अपराध मीच केला, शिक्षा तुझ्या कपाळी ! जाणीव हीच माझ्या जीवा सदैव जाळी !

२) वेद मंत्रांहून आम्हा वंद्य 'वंदे मातरम्'

३) कबीराचे विणतो शेले कौसल्येचा राम बाई कौसल्येचा राम

४) चिंचा आल्यात पाडाला हात नगा लावूस झाडाला .. माझ्या झाडाला !

५) हरवले माझे काहीतरी .. काय हरवले, कसे हरवले, काहि कळेना परी !

६) बाळा जो जो रे .. पापणीच्या पंखात झोपु दे डोळ्यांची पाखरे !

७) एका तळ्यात होती बदके पिले सुरेख .. होते कुरूप वेडे पिल्लू त्यात एक !

८) बुगडी माझी सांडली ग जाता साताऱ्याला .. चुगली नगा सांगू ग माझ्या म्हाताऱ्याला

९) एक धागा सुखाचा, शंभर धागे दु:खाचे .. जरतारी हे वस्त्र मानवा तुझिया आयुष्याचे

१०) उद्धवा, अजब तुझे सरकार ! लहरी राजा, प्रजा आंधळी, अधांतरी दरबार !

११) इंद्रायणी काठी, देवाची आळंदी .. लागली समाधी, ज्ञानेशाची

१२) सांग मला रे सांग मला .. आई आणखी बाबा यातुन .. कोण आवडे अधिक तुला ?

१३) देवा, दया तुझी की ही शुद्ध दैवलीला.. लागो न दृष्ट माझी माझ्याच वैभवाला

१४) एकवार पंखावरूनी फिरो तुझा हात .. शेवटचे घरटे माझे तुझ्या अंगणात

१५) भारतीय नागरिकाचा घास रोज अडतो ओठी .. सैनिकहो तुमच्यासाठी

१६) या डोळ्यांची दोन पाखरे फिरतील तुमच्या भवती

१७) रम्य ही स्वर्गाहून लंका .. हिच्या कीर्तीच्या सागर लहरी नाद्विती डंका

१८) गोमू माहेराला जाते हो नाखवा .. तिच्या घोवाला कोंकण दाखवा

१९) आईसारखे दैवत साऱ्या जगतावर नाही

२०) पदरावरती जरतारीचा मोर नाचरा हवा .. आई मला नेसाव शालू नवा

## १९) सुरेश (श्रीधर) भट (१९३२-२००३)



गझल म्हणजे काय ?

"एकाच वृत्तातील, एकाच यमक (काफिया) व अन्त्ययमक (रदीफ) असलेल्या प्रत्येकी २-२ ओळींचा किमान पाच किंवा त्याहून अधिक कवितांची बांधणी म्हणजे गझल. गझलेमधील ह्या प्रत्येक दोन ओळींच्या कवितेला आपण "शेर" म्हणतो. कुणी शेराला "द्विपदी" म्हणतात. गझलेतील प्रत्येक शेर हा आपल्या जागी एक संपूर्ण अभिव्यक्ती असलेली स्वतंत्र व सार्वभौम कविताच असते."

" गझलेच्या पहिल्या शेराला "मतला" म्हणतात. प्रत्येक शेरात दोन ओळी असतातच. पण मतल्याच्या शेरात दोन्ही ओळीत यमक (काफिया) आणि अन्त्ययमक (रदीफ) असते " सुरेश भट.

" सुरेश भटांना गझलचे फार मोठे आकर्षण आहे. कारण 'गझल' हे केवळ वृत्त नसून ती एक वृत्ती आहे. एव्हडेच नव्हे तर तिच्यात एक सूक्ष्म आणि सुंदर निवृत्तीही आहे. स्वार्थाच्या बाजारात धडपडण्याला आपण चुकीने प्रवृत्ती मानीत आलो आहो. क्षणभर निवृत्त मनाने जगाकडे पाहत आल्या शिवाय खऱ्या प्रवृत्तीची गोडीच कळत नाही. जीवनात नुसत्याच उंदीर-उड्या मारीत धावत सुटणे म्हणजे प्रवृत्त जीवन जगणे नव्हे. निव्वळ जगण्यासाठी म्हणून करावी लागणारी धावपळ कुणाला सुटली आहे ? पण काही क्षण त्या धावपळीचा अन्वयार्थ लावण्यासाठी काढावे लागतात. असा एखादा क्षणच कवितेला जन्म देऊन जातो." - पु.ल.देशपांडे

काही गाजलेल्या गझलेंचे मुखडे -

१) चंद्र आता -

चंद्र आता मावळाया लागला
प्राण माझाही ढळाया लागला
तोच मी होतो गडे हा तोच मी
जो तुला आता कळाया लागला (एल्गार)

२) दंश -

येणारा दिवस मला हेटाळत हसणारच
जाणारा दिवस मला जाताना डसणारच (एल्गार)

३) भल्या पहाटे निघून आले -

सख्या तुला भेटण्यास मी या भल्या पहाटे निघून आले
घरातुनी चोरपावलांनी लपून आले .. जपून आले (एल्गार)

४) तोरण -

आता जगायाचे असे माझे किती क्षण राहिले ?
माझ्या धुळीचे शेवटी येथे किती कण राहिले ? (एल्गार)

५) केव्हा तरी पहाटे -

केव्हा तरी पहाटे उलटून रात्र गेली
मिटले चुकून डोळे हरवून रात्र गेली (एल्गार)

६) उजाडल्यावारी सख्या -

उजाडल्यावरी सख्या निघून जा घराकडे
अजूनही उशीवरी टिपूर चांदणे पडे (एल्गार)

७) सुन्यासुन्या मैफलीत -

सुन्यासुन्या मैफलीत माझ्या तुझेच मी गीत गात आहे
अजूनही वाटते मला की, अजूनही चांदरात आहे (एल्गार)

८) व्यर्थ -

सूर मागू तुला मी कसा ?
जीवना तू तसा __ मी असा !
तू मला, मी तुला पाहिले;
__दु:ख माझं ! तुझा आरसा ! (रंग माझा वेगळा)

९) गौळण - सखि, मी मज हरपुन बसले ऽ ग
आज पहाटे श्रीरंगाने मजला पुरते लुटले ऽ ग
साखरझोपेमधेच अलगद प्राजक्तासम टिपले ऽ ग (रंग माझा वेगळा)

१०) माझी उदास गीते - माझी उदास गीते तू ऐकतोस का रे ?
अन् आसवात माझ्या तू नाहतोस का रे ?
येताच तू समोरी मी दर्वळून जाते
माझ्या समान तूही गंधाळतोस का रे ? (रंग माझा वेगळा)

११) उष:काल होता होता - उष:काल होता होता काळ रात्र झाली !
अरे, पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली ! (रंग माझा वेगळा)

१२) रंग खेळतो हरी - आज गोकुळात रंग खेळतो हरी;
राधिके, जरा जपून जा तुझ्या घरी ! (रंग माझा वेगळा)

१३) समजावता न आले - समजावुनी व्यथेला समजावता न आले !
मज दोन आसवांना हुलकावता न आले ! (रंग माझा वेगळा)

१४) रंग माझा वेगळा - रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा !
गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा ! (रंग माझा वेगळा)

१५) चांदण्यात फिरताना - चांदण्यात फिरताना माझा धरलास हात !
सखया रे, आवर ही सावर ही चांदरात ! (रंग माझा वेगळा)



## २०) जगदीश खेबुडकर - (१९३२- २०११)




लोकसंगीत, पोवाडा, अभंग, ओवी अशा विविध काव्य प्रकारांमध्ये त्यांनी रचना केल्या.

जगदीश खेबुडकर यांना ६०हून अधिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते.

गदिमा पुरस्कार, कोल्हापूरभूषण पुरस्कार, फाय-फौंडेशन पुरस्कार, साहित्य सम्राट पुरस्कार रसरंग फाळके पुरस्कार, व्ही.शांताराम स्मृति जीवनगौरव पुरस्कार, शिवाजी सावंत पुरस्कार बालगंधर्व स्मारक समितीचा बालगंधर्व पुरस्कार, शाहू पुरस्कार, करवीर भूषण, दूरदर्शन जीवनगौरव कुसुमाग्रज साहित्य पुरस्कार, शरद क्रीडा आणि सांस्कृतिक प्रतिष्ठानातर्फे दिलेला राम कदम कलागौरव पुरस्कार.

काही गाजलेली गीते :-

१) अगं नाच नाच राधे
२) अरे मनमोहना
३) आकाशी झेप घे रे पाखरा
४) आमचा राजू का रुसला
५) आली आली हो भागाबाई
६) आली ठुमकत नार लचकत
७) ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू दे
८) कशी नशिबानं थट्टा आज मांडली
९) कसं काय पाटील बरं हाय का?
१०) किती सांगू मी सांगू कुणाला
११) कुठं कुठं जायचं हनिमूनला
१२) कुण्या गावाचं आलं पाखरू
१३) कोण होतीस तू काय झालीस
१४) गं बाई बाई झोंबतो गारवा
१५) चंद्र होता साक्षीला
१६) छबीदार छबी मी तोऱ्यात उभी
१७) टाळ बोले चिपळीला
१८) तुझे रूप राणी कुणासारखे गं?
१९) दिसला गं बाई दिसला
२०) दे रे कान्हा चोळी अन लुगडी
२१) देहाची तिजोरी भक्तीचाच ठेवा
२२) धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना
२३) नाचू कशी, लाजू कशी, कंबर लचकली
२४) पिकल्या पानाचा देठ
२५) ब्रह्मा विष्णू आणि महेश्वर
२६) मला इष्काचि इंगळी डसली
२७) मला हे दत्तगुरू दिसले,
२८) मला हो म्हनत्यात लवंगी मिरची
२९) या रावजी बसा भावजी
३०) सख्या रे घायाळ मी हरिणी
३१) सत्यम शिवम सुंदरा
३२) सोळावं वरीस धोक्याचं गं

२१) सुधीर मोघे - (१९३९ - २०१४) हे एक मराठी कवी, गीतकार व संगीतकार होते.



पुरस्कार :

पहिल्या वर्षी सर्वोत्कृष्ट गीतकार अल्फा गौरव पुरस्कार

'मराठी कामगार साहित्य परिषदेतर्फे 'गदिमा पुरस्कार'

गदिमा प्रतिष्ठानातर्फे चैत्रबन पुरस्कार

'महाराष्ट्र साहित्य परिषदे'चा 'कविवर्य 'ना.घ. देशपांडे' पुरस्कार

पहिल्या वर्षी सर्वोत्कृष्ट गीतकार मटा गौरव पुरस्कार

महाराष्ट्र राज्य पुरस्कार सर्वोत्कृष्ट गीतकार ४ वेळा

'महालक्ष्मी ' पुरस्कार

साहित्यकार 'गो. नी. दांडेकर 'स्मृती पुरस्कार - मृण्मयी पुरस्कार

'दीनानाथ मंगेशकर प्रतिष्ठान' प्रथम वर्ष 'शांता शेळके 'पुरस्कार - हस्ते श्रीमती लता मंगेशकर

सूरसिंगार पुरस्कार सर्वोत्कृष्ट गीतकार २ वेळा

कविता संग्रह :

आत्मरंग, गाण्याची वही, पक्षांचे ठसे, लय, शब्द धून, स्वतंत्रते भगवती

सुधीर मोघे यांची काही लोकप्रिय भावगीते आणि चित्रपट गीते -

१) आदिमाया अंबाबाई
२) एक झोका चुके काळजाचा
३) एकाच ह्या जन्मी जणू
४) कुण्या देशीचे पाखरू
५) गोमू संगतीनं माझ्या तू
६) जरा विसावू या वळणावर
७) झुलतो बाई रास-झुला
८) दयाघना का तुटले
९) दिसलीस तू फुलले ऋतू
१०) दिसं जातील दिसं येतील
११) फिटे अंधाराचे जाळे
१२) मन मनास उमगत नाही
१३) माझे मन तुझे झाले
१४) माय भवानी तुझे लेकरू
१५) रात्रीस खेळ चाले
१६) विसरू नको श्रीरामा
१७) सखि मंद झाल्या तारका

१८) सजणा पुन्हा स्मरशील ना
१९) सूर कुठूनसे आले अवचित
२०) सांग तू माझाच ना
२१) सांज ये गोकुळी सावळी सावळी
२२) रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा

## २२) वंदना विटणकर - (अज्ञात - २०११)



मराठी कवयित्री, गीतकार, बालसाहित्यकार, नाटककार होत्या. मुंबईतील बालनाट्यनिर्मिती करणाऱ्या 'वंदना थिएटर्स'च्या त्या संचालिका होत्या.

त्यांनी बालरंगभूमीसाठी लिहिलेली रॉबिनहूड, टिमटिम टिंबू बमबम बगडम, बजरबट्टू इत्यादी बालनाट्ये गाजली.

वंदना विटणकर यांनी प्रेमगीते, भक्तीगीते, कोळीगीते, बालगीते अशी ७०० हून अधिक गाणी व सुमारे १५०० कविता लिहिल्या आहेत. अरूण पौडवाल, अनिल मोहिले, सुधीर फडके, श्रीकांत ठाकरे, श्रीनिवास खळे अशा संगीतकारांनी त्यांच्या गीतांना चाली दिल्या असून सुलोचना चव्हाण, प्रभा अत्रे, शोभा गुर्टू, जयवंत कुलकर्णी, सुरेश वाडकर, मोहम्मद रफी, हेमंतकुमार, आशा भोसले अशा नामवंत गायकांनी

काही लोकप्रिय गीते -
१) नाते जुळले मनाशी
२) परिकथेतील राजकुमारा
३) अधिर याद तुझी जाळीतसे रे दिलवरा
४) हा रुसवा सोड सखे
५) हे मना आज कोणी
६) शोधिसी मानवा राऊळी मंदिरी

वंदना विटणकर यांचे कवितासंग्रह : एप्रिल फूल, बजरबट्टू, भं भं भोला, हे गीत चांदण्यांचे

## विद्रोही कविता -

" मुक्तीचा शोध घेणाऱ्यांचा हा बंदिस्त शब्दलढा असला तरी त्याला समस्यांच्या खुल्या वाटांचे भान आहे. त्याचे आवाहनही आहे आणि आर्जवही. दशकांच्या वाटचालीत धरणारे शेवाळ, पडणाऱ्या मर्यादा, निर्माण होणारे खाचखळगे यांचाही विद्रोही कवितेने भोगानुभव घेतला आहे. ती जर कविता असेलच तर तिच्यातील सत्याचे सोने एक ना एक दिवस असामान्यत्वाचा ठसा प्राप्त करेल. मुक्तपणाने व मुक्तमनाने वावरणाऱ्यांना ही अनुभूती येणार, समाजाच्या सुखदुखा:सोबत हा प्रवासच स्वातंत्र्याचा खराखुरा अन्वयार्थ समजावून देईल. त्यांना तोडून केवळ कालावादाचे व आदर्शाचे स्वप्न ही कल्पनाच ठरावी. " Freedom is possible only within a society and within an imaginary isolation from it" हे सूत्र मात्र ध्यानात ठेवायला हवे."

" जीवनाच्या विराट प्रवाहाला अनेक रंगछटा असतात. धार्मिक व नैतिक छटा परंपरेची महावस्त्रे लेवून येत असल्यामुळे त्या झटकन डोळ्यात भरतात. तात्विकतेच्या अधिष्ठानाने त्यांना सजवता येते. पण अनुभवजन्य प्रत्यक्षातील जी व्यावहारिक मेख असते ती राजकीय, सामाजिक, आर्थिक, व सांस्कृतिक रंगाचा बेरंग करते. अशा बेरंगी व बेढंगी प्रत्यक्षात संवेदक-व्यक्तिमत्वाला स्वत:च स्वत:च्या मदतीसाठी झेप घ्यावी लागले. आत्मसाहाय्यार्थ घेतलेली वेगवान धावाच विद्रोही कविता हे नाव धारण करते."

"शाहीर धेगडे म. गांधीं यांच्या, समाज परिवर्तनाबद्दलच्या भूमिकेचे विश्लेषण करताना म्हणतात -

" गांधी महात्मा कसला
ढोंगाला समाज फसला."

तर केरुबुवा गायकवाड ' हरिजन ' शब्दाला ' कपट ' म्हणून निकालात काढतात.

"नको नको विठोबा देव आम्हाला. पावला का सांगा कधी महाराला ?" असा सवाल विचारून, चोखामेळ्याला शेवटी पायरीवर तिष्ठत ठेवणाऱ्या पंढरपूर निवासी विठ्ठलालाही नकार शब्दांचा निषेध झेंडा दाखवतात."

" उपलब्ध संस्कृतिसंकल्पनेचा व तिच्या लाभाचा अत्यल्प फायदा सुखी, सधन व सत्ताधाऱ्यांच्या भोवती वावरणाऱ्यांनाच मिळत असतो. तेच मूल्य संकल्पना, तत्वज्ञान व कलासौंदर्याचे निकष ठरवीत असतात. तेच विशुद्ध केलेले जीवशास्त्र सांगतात. त्यामुळे समाजाचा सगळ्यात मोठा भाग सततच दूर ठेवला जातो. हा बहुसंख्य वर्ग अनेक उणीवांनी आणि गंडानी विस्कळीत झालेला असतो. त्याच्या फुटेलपणाचाच सतत लाभ घेतला जातो. त्याला आपापसात अनेक छोट्यामोठ्या खऱ्याखोट्या कारणांनी आपसात झुंजवले जाते. आपले वर्चस्व सतत टिकवण्याचा हा एक खास मार्ग असतो. अशा सर्व तऱ्हेच्या सामान्यांना व बहुसंख्याकांना सततच ह्या ना त्या कारणाने दूर ठेवणाऱ्या व्यवस्थेच्या उच्छेदासाठी विद्रोही कविता साकारत असते."

"मुक्तीचा शोध घेणाऱ्यांचा हा बंदिस्त शब्दलढा असला तरी त्याला समस्यांचा खुल्या वाटांचे भान आहे. त्याचे आवाहनही आणि आर्जवही. दशकाच्या वाटचालीत धरणारे शेवाळ, पाडणाऱ्या मर्यादा, आणि निर्माण होणारे खाचखळगे यांचाही विद्रोही कवितेने भोगानुभव घेतला आहे. समाजातील सामान्यांबरोबर राहणाऱ्या सामान्य होऊन गेलेल्यांची ही कविता आहे. ती जर कविता असेलच तर तिच्यातील सत्याचे सोने एक ना एक दिवस असामान्यत्वाचा ठसा प्राप्त करेल. फक्त मुक्तपणाने व मुक्तमनाने वावरणाऱ्यांना ही अनुभूती येणार, समाजाच्या सुखदुःखासोबतचा हा प्रवासच स्वातंत्र्याचा खराखुरा अन्वयार्थ समजावून देईल. त्यांना तोडून केवळ कलावादाचे व आदर्शाचे स्वप्न ही कल्पनाच ठरावी. ' Freedom is possible only within a society and not within an imaginary isolation from it ' हे सूत्र मात्र ध्यानात ठेवायला हवे. " - केशव मेश्राम, प्रस्तावना 'विद्रोही कविता'.

१) शरच्चंद्र मुक्तिबोध -

पाठिशी विराट ओझे दु:खाने बधीर गात्र
दास्याच्या अंधारातून कोटिश: शरीरे जात
कर्माच्या चरकातून पिचून नि:सत्व होत
जीवन जाहले होते विषांचा कडवट घोट

२) केशव मेश्राम -

नाच -
रंगमंचावर मी पाय टाकताच डफावर थाप पडली,
झाडाझाडांवर लटकलेली वटवाघळे दचकली,
झाडीतले जून - जुनाट काजवे दचकून उडाले:
त्यांचे कुल्ले झगमगले, साऱ्यांना उजेडाच वाटला,
माझ्या पहिल्याच एन्ट्रीला अंधार टर्कन फाटला.

३) नामदेव ढसाळ -

दरग्याच्या वाटेवर -
लीक झालेला सूर्य विझत गेला
रात्रीच्या मिठीत तेव्हा जन्मलो मी
फुटपाथवर चिलबटलेल्या चिरगुटात
आणि झालो मी अनाथ
मला जन्म देणारी गेली आकाशीच्या बाप्पाकडे.

४) दया पवार -

चिमणी -
देवांच्या भाकड कथांचा समुद्र
गढूळलेल्या अपरंपार लाटा
गुडघाभर पाण्यात उभी चिमणी
नाकातोंडात जाते पाणी

५) मल्लिका अमरशेख -

संभावित सूर्यासारखे -
संभावित सूर्यासारखे तुम्ही नेहमीच निर्विकार असता
नित्यनेमाने पाठ फिरवून चालायला लागणारे.
तुमचे विचार मुरलेल्या लोणच्यासारखे बंद बरणीत
सारं पंचतंत्र तोंडपाठ असतंय तुम्हाला.
तुम्ही हुकुमाचे पत्ते हातात ठेवूनच नेहमी खेळता.

६) फ.मु. शिंदे -

निघाले  हे चक्र -
निघाले हे चक्र । मुंडकी छाटीत
मरण वाटीत । नवसांचे ॥
चक्रपाणी दीन । आवरेना शस्त्र
मिटलेले नेत्र । संहारात ॥

- विद्रोही कविता - सं. प्रा. केशव मेश्राम

## मराठी पद्य वृत्ते-छंद -

गद्य व पद्य यातील फरक -

आपल्या मनात येणारे विचार आपण भाषेच्याद्वारे व्यक्त करतो. ही विचार व्यक्त करण्याची पद्धती दोन प्रकारची आहे. :

'गद्य' - आपल्यामनात जसे विचार येत जातात ते जसेच्या तसे बोलून दाखविणे. आपल्या या स्वाभाविक बोलण्याला 'गद्य' असे म्हणतात.

'पद्य' - हे विचार किंवा याच वाक्यातील शब्द काही ठरावीक क्रमाने लिहून ते सुरावर म्हणता येतील अशा पद्धतीने त्याची रचना केली तर त्याला 'पद्य' असे म्हणतात.

कवितेचे 'व्याकरण' ! व्याख्या -

'चरण', 'लय' - पद्याचा चरण म्हणताना सारख्या अंतराने ताळी वाजवीत राहावे असे वाटते. यालाच 'लय' असे म्हणतात.

'वृत्त', 'छंद' - पद्यात ही जी विशिष्ट शब्दरचना आपण करतो तिला 'वृत्त' किंवा 'छंद' म्हणतात.

'अक्षरगणवृत्त' - अक्षरांच्या संख्येनुसार आणि ऱ्हस्व-दीर्घ क्रमाने येणारी शब्दरचना.

'मात्रावृत्त', 'जाती' - अक्षरांपेक्षा मात्रांचे बंधन आहे अशी पद्यरचना.

'मात्रा' - एखाद्या अक्षराचा उच्चार करण्यास जो कालावधी किंवा वेळ लागतो त्याला मात्रा असे म्हणतात. (म्हणूनच 'ची' अक्षर पुष्कळदा 'चि' असे ऱ्हस्व लिहित असावेत !) ऱ्हस्व-दीर्घला लघु-गुरू असेही म्हणतात.

'गण' - गण म्हणजे कवितेतील अक्षरे मोजण्याचे माप ! तीन अक्षरांचा गट .

'यती' - कवितेचे चरण म्हणताना आपण मध्येच काही अक्षरांनंतर थांबतो. या थांबण्याच्या जागेला किंवा विरामाला 'यती' असे म्हणतात.

मराठीत नेहमी आढळणारी अशी प्रमुख अक्षरगणवृत्ते, मात्रावृत्ते व छंद -

इंद्रवज्रा, उपेंद्रवज्रा, उपजाती, भुजंगप्रयात, द्रुतविलंबित, वसंततिलका, मालिनी, शिखरिणी, मंदाक्रांता, पृथ्वी, हरिणी, शार्दुलविक्रीडित, स्रग्धरा, मंदारमाला, सुमंदारमाला.

मात्रावृत्ते (जाती) - कटाव, फटके, भूपाळ्या व आरत्या, अंगाई-गीते व पाळणे, लावण्या, भृंग, दिंडी, आर्या, उद्धव, बालानंद, भूपतिवैभव, चंद्रकांत, सूर्यकांत, साकी, अक्रूर, फटका, केशवकरणी, मुद्रिका, नववधू, प्रणयप्रभा, जीवनलहरी, अनुष्टुभ, मुक्तछंद.

शब्दालंकार -

१) अनुप्रास - एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेव्हा त्याला सौंदर्य प्राप्त होते, तेव्हा 'अनुप्रास' हा अलंकार होतो. उदा:
"गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले,
शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले"

२) यमक - कवितेच्या चरणाच्या शेवटी, मध्ये किंवा ठरावीक ठिकाणी एक किंवा अनेक अक्षरे वेगळ्या अर्थाने आल्यास 'यमक' हा अलंकार होतो. उदा:
" सुसंगती सदा घडो, सुजनवाक्य कानी पडो !
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो !"

३) श्लेष - एकच शब्द वाक्यात दोन अर्थांनी वापरल्यामुळे जेव्हा शब्द चमत्कृती साधते तेव्हा 'श्लेष' हा अलंकार होतो. उदा:

"कुस्करु नाक ही सुमने |
जरी वास नसे तिळ यास, तरी तुम्हास अर्पिली सु-मने ||"

४) उपमा - दोन वस्तूंतील साम्य चमत्कृतीपूर्ण रीतीने जेथे वर्णना केलेले असते तेथे 'उपमा' हा अलंकार होतो. उदा:

" आभाळागत माया तुझी आम्हावरी राहू दे |”

५) उत्प्रेक्षा - उपमेय हे जणू उपमानच आहे असे जेथे वर्णिलेले असते तेथे 'उत्प्रेक्षा' हा अलंकार होतो. उदा:

" किती माझा कोंबडा मजेदार | मान त्याची किती बाकदार |
शिरोभागी तांबडा तुरा हाले | जणू जास्वंदी फूल उमललेले ||
अर्धपायी पांढरीशी विजार | गमे विहगांतिल बडा फौजदार ||"

६) अपन्हुती - उपमेयाचा निषेध करून ते उपमानच आहे असे जेव्हा सांगितले जाते तेव्हा ' अपन्हुती' अलंकार होतो. उदा:

" आई म्हणोनी कोणी, आईस हाक मारी
ती हाक येई कानी, मज होय शोककारी
नोहेच हाक माते, मारी कुणी कुठारी "

७) रूपक - उपमेय व उपमान यात एकरूपता आहे. ती भिन्न नाहीत असे वर्णन जेथे असते तेथे 'रूपक' हा अलंकार असतो. उदा :

" बाई काय सांगो, स्वामीची ती दृष्टी
अमृताची वृष्टी, मज होय "

८) व्यतिरेक - उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ आहे असे वर्णन केले असेल तर 'व्यतिरेक' हा अलंकार होतो. उदा:

" अमृताहुनीही गोड, नाम तुझे देवा "

९) अनन्वय - उपमेयाला दुसऱ्या कशाचीच उपमा देता येत नसेल म्हणजे जेव्हा उपमेयाला उपमेयाचीच उपमा दिली जाते तेव्हा ' अनन्वय ' हा अलंकार होतो. उदा:

" झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु यासम हा "

१०) भ्रान्तिमान - उपमेयच आहे असा भ्रम निर्माण होऊन तशी काही कृती घडली तर तेथे ' भ्रान्तिमान' हा अलंकार असतो. उदा:

" भृंगे विराजित नवी अरविंद पत्रे
पाहूनि मानुनि तिचीच विशाल नेत्रे
घालीन अंजन अशा मतिने तटाकी
कांते वृथा उतरलो, भिजलो विलोकी "

(भृंग्यांनी सुशोभित झालेली कमलपत्रे हे दमयंतीचे नेत्रच आहेत असे समजून तिच्या डोळ्यांत अंजन घालावयास नलराजा पुढे सरसावला व पाण्यामुळे भिजला.)

११) ससंदेह - उपमेय कोणते व उपमान कोणते असा संदेह किंवा संशय निर्माण होऊन मनाची जी द्विधा अवस्था होते, त्या वेळी 'ससंदेह' हा अलंकार असतो. उदा:

" चंद्र काय असे, किंवा पद्म या संशयांतरी,
वाणी मधुर ऐकोनी कळले मुख असे ते. "

१२) अतिशयोक्ती - कोणतीही कल्पना आहे त्यापेक्षा खुप फुगवून सांगताना त्यातील असंभाव्यता अधिक स्पष्ट करून सांगितलेली असते. त्यावेळी 'अतिशयोक्ती' हा अलंकार होतो. उदा:

" जो अंबरी उफळता खुर लागलाहे
तो चंद्रमा निज तनूवरि डाग लाहे."

१३) दृष्टांत - एखाद्या विषयाचे वर्णन करून झाल्यानंतर ती गोष्ट पटवून देण्यासाठी त्याच अर्थाचा एखादा दाखला किंवा उदाहरण दिल्यास 'दृष्टांत' अलंकार होतो. उदा:

" लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा
ऐरावत रत्न थोर, त्यासी अंकुशाचा मार."

१४) अर्थान्तरन्यास - एखाद्या सामान्य विधानाच्या समर्थनार्थ विशेष उदाहरणे देऊन शेवटी सामान्य सिद्धांत काढला तर 'अर्थान्तरन्यास' हा अलंकार होतो. उदा:

" बोध खलास न रुचे अहिमुखी दुग्ध होय गरल,
श्वानपुच्छ नलिकेत घातले होईना सरळ "

१५) स्वभावोक्ती - एखाद्या व्यक्तीचे, प्राण्याचे, वस्तूचे, त्याच्या स्वाभाविक स्थितीचे किंवा हालचालीचे यथार्थ पण वैशिष्ठ्यपूर्ण वर्णन याला ' स्वभावोक्ती' अलंकार म्हणतात. उदा:

"मातीत ते पसरले अतिरम्य पंख

केले वरी उदर पांडुर निष्कलंक !
चंचू तशी उघडी, पद लांबविले,
निष्प्राण देह पडला, श्रमही निमाले !"

१६) अन्योक्ती - दुसऱ्याला उद्देशून बोलून आपले मनोगत व्यक्त करण्याच्या या पद्धतीला ' अन्योक्ती' असे म्हणतात. उदा:
"येथे समस्त बहिरे बसतात लोक, का भाषणे मधुर तू करीशी अनेक,
हे मूर्ख यास किमपिही नसे विवेक, रंगावरून तुजला गणतील काक."

१७) पर्यायोक्त - एखादी गोष्ट सरळ शब्दात न सांगता ती अप्रत्यक्ष रीतीने सांगणे यास 'पर्यायोक्त' असे म्हणतात.
'त्याचे वडील सरकारचा पाहुणचार घेत आहेत.'

१८) विरोधाभास - एखाद्या विधानावर वरवर दिसायला विरोध असे वाटते; पण वास्तविक तसा विरोध नसतो. अशा ठिकाणी ' विरोधाभास' हा अलंकार असतो. उदा:

"कठोर वज्रापेक्षाही मृदू पुष्पहुनी अशी,
लोकोत्तरांची हृदये कळती न कुणासही."

१९) असंगती - एका ठिकाणी आणि त्याचे कार्य दुसऱ्याच ठिकाणी असे जेथे वर्णन असते त्यास 'असंगती' अलंकार म्हणतात. उदा:

"गुलाब माझ्या हृदयी फुलला, रंग तुझ्या गालावर खुलला,
काटा माझ्या पायी रुतला, शूल तुझ्या उरि कोमल का ?"

२०) सार - एखाद्या वाक्यातील कल्पना चढत्या क्रमाने मांडून उत्कर्ष किंवा अपकर्ष साधलेला असतो, तेव्हा 'सार' हा अलंकार होतो. उदा:
" आधीच मर्कट तशातहि मद्य प्याला, झाला तशात जरि वृश्चिक दंश त्याला,
झाली त्यास तदनंतर भूतबाधा, चेष्टा वदू मग किती कपिच्या अगाधा."

२१) व्याजस्तुती - (व्याज = खोटे, कपट, ढोंग) बाह्यत: स्तुती पण आतून निंदा किंवा बाह्यत: निंदा पण आतून स्तुती असे जेथे वर्णन असते तेथे 'व्याजस्तुती' हा अलंकार असतो. उदा:
"होतो वदनचंद्राच्या दर्शनाचीच आस ।
अर्धचंद्रच तू द्यावा, कृपा याहून कोणती ॥

२२) व्याजोक्ती - एखाद्या गोष्टीचे खरे कारण लपवून दुसरेच कारण देण्याचा जेथे प्रयत्न होतो तेथे 'व्याजोक्ती' हा अलंकार असतो.

"येत क्षण वियोगाचा पाणी नेत्रामध्ये दिसे,
'डोळ्यात काय गेले हे ? म्हणुनी नयन पुसे."

२३) चेतनगुणोक्ती - निसर्गातील निर्जीव वस्तू सजीव आहेत अशी कल्पना करून ती मनुष्याप्रमाणे वागतात किंवा कृती करतात असे जेथे वर्णन असते तेथे ' चेतनगुणोक्ती' हा अलंकार असतो.

उदा:

"आला हा दारि उभा वसंत फेरीवाला
पोते खांद्यावरि सौद्याचे, देइल ज्याचे त्याला."

संदर्भ :
१) सुगम मराठी व्याकरण लेखन, लेखक - कै. मो. रा. वाळंबे, नितीन प्रकाशन, पुणे ३०
२) https://mr.wikipedia.org
३) मराठी विश्वकोश
४) आठवणीतली गाणी
५) मराठी भाषा उद्गम आणि विकास
६) मराठी कविता ११५०-१८४०

खालील पुस्तकांच्या प्रस्तावना -
१) मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष - 'सांगाती' कवी अनिल - आत्माराम रावजी देशपांडे
२) मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष - 'शीळ' कवी ना.घ.देशपांडे
३) गं. भा. निरंतर - 'अर्वाचीन काव्य'
४ वि.स.खांडेकर - 'विशाखा' कुसुमाग्रज
५) पांच कवि
६) काव्यदोहन
७) अभिनव काव्यमाला
८) काव्यामोद
९) झेंडूची फुले - आचार्य अत्रे
१०) अर्वाचीन काव्य
कवींच्या काव्यसंग्रहातील प्रस्तावना / निवेदन

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी पुस्तक वाचायला कुठे जायची गरज नाही. तुमच्या मोबाईलवर आता हजार मराठी ई पुस्तके आहेत.

मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा. हे सर्व मोफ़त आहे. No terms. No Conditions.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com